रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १४९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ६ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

### गावखेड्यात गतीमान इंटरनेट पोहोचणार

**मुंबई :** जगविख्यात उद्योजक इलॉन मस्क यांची कंपनी असलेल्या स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड सोबत महाराष्ट्र सरकारचा करार झाला आहे. स्टारलिंक आणि महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागसमवेत सामंजस्य करारामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित या सामंजस्य करारावर स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव विरेंद्र सिंह यांनी स्वाक्षरी केली. या करारानंतर स्टारलिंकसोबत औपचारिक भागीदारी करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे.

निसर्ग हॉलिडेज्, अलिबाग

थायलँड पटाया
१६/११/२५, २६/११/२५, ३०/११/२५
४ स्टार हॉटेल
४ रात्र/पाच दिवस
विजा फ्री
₹45000/-

दिल्ली, आग्रा, अमृतसर, वैष्णोदेवी
१८/१२/२५, २३/१/२०२६
वन साईट ट्रेन/ वन साईट प्लेन
थ्री स्टार हॉटेल,
८ रात्र/९ दिवस
₹19999/-

केरळ, कोचीन, मुन्नार, टेकडी, वडकला, देवेंद्र, कन्याकुमारी
२२/१/२६
दोन्ही साईट थ्री टाकर ट्रेन
एसी/थ्री स्टार हॉटेल
८ रात्र/९ दिवस
₹17999/-

बेंगलोर, म्हैसूर, उटी, कुन्नूर
१/१२/२०२५
दोन्ही साईट थ्री टायर ट्रेन
थ्री स्टार हॉटेल
६ रात्र/ ७ दिवस
₹13500/-

प्रभाकर पटेल : ९८८०२४१६६९
चंद्रकांत म्हात्रे : ९२६०७४५३२६/ अभिनव ठोंबर : ७७२१९२७४०४

## वेधक

### सोमवारी महाड बंदचा इशारा!

**महाड :** महाड शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) शहराध्यक्ष पंकज उमासरे यांच्यावर शनिवारी दुपारी १ वाजता शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता. रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्यावर सोशल मीडियावर टीका केल्यामुळे हा हल्ला झाल्याचे वृत्त आहे. या घटनेनंतर, मनसे नेते अविनाश जाधव यांनी महाड शहर पोलीस ठाण्याला भेट देऊन या प्रकरणी पोलिसांनी केलेल्या कारवाईचा जाब विचारला. येत्या शनिवारपर्यंत आरोपींना अटक न केल्यास सोमवारी महाड बंद ठेवण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. या हल्ल्याच्या निषेधार्थ उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस •>पान २ वर

### अत्याचार प्रकरणात तरुणाला अटक

**नवी मुंबई :** उलवे भागातील २३ वर्षीय तरुणीने १४ वर्षीय मुलीवर निर्जनस्थळी लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी उलवे पोलिसांनी बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. उलवे परिसरात राहणाऱ्या मुलाची नवरात्रीमध्ये पीडितेशी गरबा खेळताना ओळख झाली होती. या ओळखीतून आरोपीने मुलीसोबत मैत्री वाढवली. २८ ऑक्टोबर रोजी दोघेही कारमधून शिवमंदिरालगत खाडीकिनारी फिरायला गेले होते. यावेळी तरुणाने पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार केले. कुणाला काही सांगितले तर मारून टाकण्याची धमकी दिली. पीडित मुलीने मात्र घडलेल्या प्रकाराची माहिती तिच्या आई-वडिलांना दिली.

### दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू

**महाड :** रायगडच्या वरंध घाटात बुधवारी (दि.५) एक भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. रायगड आणि पुणे जिल्ह्यांना जोडणाऱ्या वरंध भोर घाटात एका मोटरसायकल चालकाचा १०० फूट वरून कोसळल्याने जागीच मृत्यू झाला. शिवाजी डेरे हा तरुण मुंबईवरून भोर तालुक्यातील शिळींब या मूळ गावात जात असताना घाटातील साईडपट्टीचा अंदाज न आल्याने गाडी १०० फुट खोल खाली कोसळली. या व्यक्तीची ओळख पटली असून त्याचे नाव शिवाजी डेरे असे होते. ते भोर तालुक्यातील शिळींब गावाचा रहिवासी होते. त्यांची दुचाकी साईडपट्टी सोडून खाली आल्याने शिवाजी डेरे घसरुन खालच्या रस्त्यावर आपटले. त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाली आणि जागीच मृत्यू झाला. या ठिकाणी संरक्षण भिंत नसल्यामुळे अशा प्रकारचे अपघात वारंवार घडत आहेत.

### रेल्वेच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** रेल्वेने दिलेल्या धडकेत एका अनोळखी इसमाचा मृत्यू झाल्याची घटना सोमटणे रेल्वे स्टेशनजवळ, पनवेल येथे घडली. या मृत इसमाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस घेत आहेत. ३ नोव्हेंबर रोजी एक इसम बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्याने त्याला उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे दाखल केले. यावेळी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या इसमाच्या मृत्यूची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक | रायगड जिल्हाधिकारी यांची माहिती

# रायगडात 4,156 दुबार मतदार

**| रायगड | प्रतिनिधी |**

**राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. त्यात रायगड जिल्ह्यातील १० नगरपरिषदांचा समावेश आहे. नगरपरिषदांमधील २१७ सदस्य तर १० थेट नगराध्यक्ष निवडले जाणार आहेत. जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीसाठी २ लाख ३७ हजार ५०३ मतदार आहेत. त्यात ४ हजार १५६ दुबार मतदार आहेत. या दुबार मतदारांवर निवडणूक यंत्रणेची करडी नजर असणार आहे. या मतदारांच्या नावासमोर डबल स्टार लावण्यात आले आहेत. या मतदारांना मतदानासाठी प्रभाग निवडायची संधी देण्यात येणार आहे. थेट मतदान केंद्रावर येणाऱ्या दुबार नाव असलेल्या मतदारांकडून मतदान एकाच ठिकाणी केल्याचे हमीपत्र लिहून घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.**

**2,37,503 मतदार बजावणार मतदानाचा हक्क**



राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील नगर परिषद, नगरपंचायतीची निवडणूक जाहीर केल्याने नगरपरिषद क्षेत्रात आणि शहराच्या लागत असणाऱ्या ग्रामीण भागात आचारसंहिता जाहीर झाली आहे. नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या हद्दीतील मतदारांवर प्रभाव पडेल, असे कार्यक्रम जिल्ह्यात इतरत्र घेता येणार नाही. तसे झाल्यास तो आचारसंहितेचा भंग ठरणार आहे, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यात असणाऱ्या १० नगर परिषदांमध्ये केलेल्या मतदार याद्यांच्या तपासणीमध्ये तब्बल ४ हजार १५६ दुबार मतदार आढळून आले आहेत. यामध्ये खोपोली नगरपरिषदेमध्ये सर्वाधिक ८९१ दुबार मतदार आढळले आहेत. त्याखालोखाल कर्जत नगरपरिषद ८१७, पेण नगरपरिषद ७८४, उरण नगरपरिषद ७८१, महाड नगरपरिषद ३५९, अलिबाग नगरपरिषद २४४, श्रीवर्धन नगरपरिषद १३१, मुरूड जंजिरा नगरपरिषद ६९, रोहा नगरपरिषद ६२ आणि माथेरान नगरपरिषदेमध्ये १८ दुबार मतदारांची नावे आढळली आहेत, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

नगरपरिषद हद्दीमध्ये आढळलेल्या प्रत्येक दुबार मतदारांच्या घरी नगरपरिषदांचे अधिकारी-कर्मचारी जाणार आहेत. त्यांना नेमके कोणत्या प्रभागात किंवा नगरपरिषदेसाठी मतदान करायचे आहे, हे त्यांच्याकडून लिखित घेतले जाणार आहे. थेट मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी दुबार मतदार मतदान केंद्रावर मतदानासाठी आल्यावर त्यांच्या कडून हमीपत्र लिहून घेण्यात येणार आहे. नगर परिषदमधील प्रत्येक मतदाराला त्यांच्या द्विसदस्यीय प्रभागातील दोन उमेदवारांना प्रत्येक मत द्यायचे आहे. तर यंदा नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जाणार असल्याने त्या उमेदवारालाही मतदारास तिसरे मत द्यावे लागणार आहे.

जिल्ह्यातील १० नगर परिषदांमधील निवडणुकीसाठी १०७ प्रभाग असणार आहेत. यामध्ये खोपोली सर्वात मोठी नगरपरिषद असून या नगरपरिषदेमध्ये १५ प्रभाग, पेण नगरपरिषद १२ प्रभाग, अलिबाग, श्रीवर्धन, मुरूड जंजिरा, रोहा, महाड, उरण, कर्जत आणि माथेरान या नगरपरिषदांमध्ये १० प्रभाग असणार आहेत. जिल्ह्यातील नगरपरिषदांमध्ये २१७ नगरसेवक निवडण्यात येणार आहेत. यामध्ये खोपोली नगरपरिषदेमध्ये ३१, पेण २४, उरण २१, कर्जत २१, अलिबाग, श्रीवर्धन २०, मुरूड जंजिरा २०, रोहा २०, महाड २० आणि माथेरान नगरपरिषदेमध्ये २० नगरसेवक सार्वत्रिक निवडणुकीद्वारे निवडण्यात येणार आहेत.

नगरपरिषदांसाठी •>पान २ वर

#### निवडणूक खर्चात वाढ

मतदानास जाताना मतदारांना मोबाईल घेऊन जाता येणार नाही. त्यासंबंधीचा निर्णय आवश्यकतेनुसार तेथील मतदान अधिकारी घेतील. दुसरीकडे उमेदवारांच्या निवडणूक खर्चातही वाढ करण्यात आली आहे. अ वर्गाच्या नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारास १५ लाख तर सदस्यांसाठी नऊ लाख, ब वर्गाच्या नगरपरिषदांमधील अध्यक्षपदाच्या उमेदवारास ११ लाख २५ हजारांचा आणि सदस्यांसाठी साडेतीन लाखांपर्यंत मर्यादा आहे. क वर्गाच्या नगरपरिषदांमध्ये अध्यक्षपदासाठी साडेसात लाख रुपये तर सदस्याच्या उमेदवारांना अडीच लाखांचा खर्च करता येणार आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली

**धोकादायक पुलावरून वाहतूक सुरूच**





**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

धोकादायकपुलांवरून अवजड वाहतूकीला बंदी असतानादेखील, नवेदर बेली, नवघर, पाल्हे येथील पुलांवरून अवजड वाहने धावत आहेत. अलिबाग-रोहा मार्गावरील नवघर, नवेदर बेली, पाल्हे येथील पुलावरून कंपन्यांसह मोठ-मोठे खासगी ट्रक, डंपर अशा अवजड वाहनांची वाहतूक खुलेआमपणे होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असूनदेखील या आदेशाला केराची टोपली दाखवून वाहतूक केली जात आहे. त्यामुळे अवजड वाहन चालकांवर प्रशासनाचा अंकुश राहिला नसल्याचे यावरून दिसून येत आहे.

विजना कन्स्लटींग इंजिनिअरींग प्रा. लि. या संस्थेमार्फत अलिबाग-रोहा, अलिबाग-रेवदंडा, पोयनाड-उसर-भादाणे व भाकरवड-देहेन या मार्गांवरील नवघर पुल, सुडकोली पूल, स्लॅब कलवर्ट, सहाण पुल, नवेदर बेली पुल, भाकरवड-देहन रस्त्यावरील देहेन अशा पुलांचे ऑगस्ट महिन्यात स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले होते. या पुलांची व स्लॅब कलवर्टची रस्त्यावरील भार क्षमता पाच ते १६ टन असल्याचे स्पष्ट झाले होते. महत्त्वाच्या रस्त्यांवरील पूल व स्लॅब कलवर्ट संरचनात्मकदृष्ट्या धोकादायक स्थितीत असल्याचे निर्दशनास आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी या धोकादायक पुलांवरून अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्काळ बंदीचा आदेश जारी केला होता. •>पान २ वर

> **धोकादायक पुलांवर अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. ठिकठिकाणी फलक लावण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्या आहेत. काही पूल दुरुस्त केले आहेत. त्या पुलावरून १६ टनापर्यंतच्या वाहनांना प्रवेश आहे.**
> **– अभिजीत भुजबळ, पोलीस निरीक्षक, रायगड**

#### अवजड वाहतूकीवर राहणार नजर

अलिबाग-रोहा मार्गावरील नवघर, वढाव, सहाण बायपास येथील पाल्हे, अलिबाग रेवदंडा मार्गावरील नवेदर बेली पूल धोकादायक आहे. या पुलांवरून अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. वढाव येथील पूल कोसळण्याची पुनरावृत्ती घडू नये, म्हणून पोलिसांची मदत घेतली जाणार आहे. पोलिसांना पत्र देऊन अवजड वाहतुकीवर लक्ष ठेवण्याची मागणी केली जाणार आहे. तसेच वढाव येथील पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून गुरुवारपासून हा पूल वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता आहे, असे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी दिली.

#### ठेकेदाराची निवड राजकीय दबावातून?

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्ता पावसाळ्यात दलदलीसारखा बनत आहे. शाळकरी मुले, कामगार आणि शेतकरी व प्रवाशांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या रस्त्याच्या कामासाठी ठेकेदाराची निवड राजकीय दबावाखाली झाली असून निधीचा गैरवापर करण्यात आला असल्याची चर्चा आहे. अलिबाग-रोहा रस्त्याच्या रुंदीकरणासह मजबुतीकरण, नूतनीकरणाच्या कामासाठी ठेकेदाराला १०४ कोटी रुपये दिले आहेत. मात्र काम पूर्ण केले नसल्याची चर्चा सध्या सुरु आहे. त्यामुळे १०४ कोटी रुपये कोणाच्या घशात गेले? असा सवाल उपस्थित केला जात आहे. अलिबाग रोहा रस्ता हा विकासाऐवजी भ्रष्टाचार आणि निष्क्रियतेचे प्रतीक बनला आहे.

**चौलच्या रामेश्वर मंदिराला दीपोत्सवाचा साज...**

(छायाचित्र : महेंद्र खैरे)

**त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त अलिबाग तालुक्यातील चौल येथील आंग्रेकालीन श्री रामेश्वर मंदिरात दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.**



### कर्जमाफी नाही, तोपर्यंत मत नाही असे बोर्ड लावा

**उद्धव ठाकरेंचं शेतकऱ्यांना आवाहन**

मुंबई : राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा झाली असताना, दुसरीकडे शिवसेनाउबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे ४ दिवसांच्या मराठवाडा दौऱ्यावर पोहोचले आहेत. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरकारची मदत मिळाली की नाही? शेतकऱ्यांना शासकीय मदत किती मिळाली, याचा आढावाच ते या दौऱ्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन घेत आहेत. उद्धव ठाकरेंनी बुधवारी (दि.५) धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांची भेट घेत •>पान २ वर

# हक्काच्या नगदी पिकांवर संकट

**धम्मशील सावंत**

**| पाली/बेणसे |**



लोकप्रिय पोपटीचा सीझन पुढे सरकला

लांबलेल्या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील भात शेतीचे अतोनात नुकसान तर झालेच. पण आता कडधान्य या नगदी पिकांवरदेखील संकट ओढावले आहे.

रब्बी हंगामात जवळपास साधारणतः बारा ते साडे पंधरा हजार हेक्टरवर कडधान्यांचे पिक घेतले जाते. भात शेतीची सर्व कामे आटोपल्यावर शेतकरी राजा आपल्या शेतात कडधान्य लावतो. त्यातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडते. मात्र लांबलेल्या पावसामुळे सध्या कडधान्य पिकास पूरक हवामानदेखील नाही. शेतजमिनीत पाणी साठले आहे. भातपीक शेतात काढणी अभावी तसेच आहे. त्यामुळे आता कडधान्य •>पान २ वर

#### कडधान्य पिकाला फटका

जिल्ह्यात भातासह शेतीपुरक वाल, मूग, मटकी, तूर व चवळी आदी कडधान्यांची रब्बी हंगामातील पिके घेतली जातात. कडधान्यामध्ये सर्वात जास्त म्हणजे जवळपास तीन ते चार हजार हेक्टरवर वालाची लागवड केली जाते. त्यानंतर मुग, मटकी, चवळी, तूर आदीं कडधान्याची लागवड केली जाते. शेताच्या बांधावर तुरीची लागवड केली जाते तर बाकी कडधान्य शेतात लावले जाते. •>पान २ वर

> **भात शेतीचे नुकसान तर झालेच आता कडधान्य पिकालादेखील फटका बसला आहे. त्यानुसार प्रत्येक हंगाम सांभाळावा लागतो. परतीच्या पावसामुळे आता कडधान्य पिकाचा हंगाम जवळपास गेला आहे. स्वतः च्या शेतात लावलेले चार किलोचे चवळीचे पीक परतीच्या पावसामुळे खराब झाले आहे.**
> **– शरद गोळे, अध्यक्ष, कृषी मित्र संघटना, सुधागड-पाली**

# फळपीक विमा तातडीने मिळावा

**महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाची मागणी**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

मागील वर्षी २०२४-२०२५ च्या हंगामातील पुनर्रचित हवामान अधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी विम्याची नोंद केली. २०२५- २०२६ या येणाऱ्या हंगामाचा प्रिमिअम भरण्याची मुदत ३० नोव्हेंबरला संपणार आहे. तरीदेखील आजपर्यंत रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना या योजनेचे पैसे मिळाले नाही.

शेतकऱ्यांच्या हक्काची विमा नुकसान भरपाई तातडीने मिळावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी केली आहे. याबाबत कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी यांना निवेदन देण्यात आले आहे. जिल्ह्यासाठी युनिव्हर्सल सॅम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. कंपनीने निश्चित केलेला विमा हवामान •>पान २ वर

#### शेतकरी वर्गात संताप

सिंधूदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिवाळीपूर्वी मिळाली आहे. मात्र रायगडसह पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्याप मिळाली नाही. त्यामुळे शेतकरी वर्गात नाराजी निर्माण झाली असून संताप व्यक्त करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली.

जेईई, नीटच्या तयारीसाठी होणार फायदा | प्रत्येक जिल्ह्यातील १०० विद्यार्थ्यांना संधी

# ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी 'सुपर ५०' उपक्रम

**| रायगड | प्रतिनिधी |**

ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना देशपातळीवरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या जेईई, नीट यांसारख्या प्रवेश परीक्षांची तयारी करता यावी, म्हणून आता राज्यात लवकरच सुपर ५० हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

प्रत्येक जिल्ह्यातील १०० विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम असणार आहे. या संबंधीचा प्रस्ताव माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागातर्फे राज्य सरकारसमोर मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. उत्पन्न कमी असलेल्या पालकांच्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीनंतर अकरावी आणि बारावीचे शिक्षण घेताना जेईई आणि नीट परीक्षेची पुरेशी तयारी करता येत नाही. अशा विद्यार्थ्यांची जेईई, नीट यांसारख्या परीक्षांची तयारी करून घेण्यासाठी नाशिक जिल्ह्यात सुपर ५० हा उपक्रम राबविण्यात आला.

या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने या उपक्रमाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे.या प्रस्तावानुसार जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शासकीय, अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांमधून दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम असणार आहे. यात सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना कोठेही विज्ञान शाखेत प्रवेश घेणे बंधनकारक राहणार आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्नाची कमाल मर्यादा दोन लाख इतकी असावी. उपक्रमात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशासनाने निश्चित केलेल्या शैक्षणिक संस्था, शासकीय, खासगी प्रशिक्षण संस्थेत दोन वर्ष निवासी निःशुल्क प्रशिक्षण घेणे बंधनकारक असणार आहे. प्रशिक्षण अभ्यासक्रम अर्धवट सोडता येणार नाही, असे प्रस्तावात नमूद केले आहे.

> **नाशिक जिल्ह्यातील 'सुपर ५०'हा नावीन्यपूर्ण उपक्रम संपूर्ण राज्यभर राबविण्यासाठी, त्या अनुषंगाने प्रस्ताव राज्य सरकारसमोर सादर करण्यात आला आहे. यात दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना जेईई आणि नीट या परीक्षांची तयारी करून घेण्यात येणार आहे.**
> **– डॉ. महेश पालकर,** संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभाग.

#### प्रति जिल्हा दोन कोटी खर्च अपेक्षित

या उपक्रमासाठी प्रति जिल्हा १०० विद्यार्थ्यांची निवड चाचणीद्वारे करण्यात येणार आहे. याप्रमाणे ३६ जिल्ह्यांतून तीन हजार ६०० विद्यार्थी निवडले जातील. प्रति विद्यार्थ्याचा दोन वर्षांचा खर्च दोन लाख रुपये गृहित धरण्यात आला आहे. त्यानुसार, प्रत्येक जिल्ह्यातील १०० विद्यार्थ्यांसाठी दोन कोटी रुपये खर्च अपेक्षित धरला आहे. याप्रमाणे एकूण ३६ जिल्ह्यांसाठी ७२ कोटी रुपयांचा निधी आवश्यक असल्याचे शिक्षण विभागाने राज्य सरकारला पाठविलेल्या प्रस्तावात स्पष्ट केले आहे.

#### निवड चाचणी घेण्याचा प्रस्ताव

सुपर ५० उपक्रमात सहभागी होण्यास इच्छुक विद्यार्थ्यांना निवड चाचणी परीक्षा देणे अनिवार्य राहणार आहे. निवड चाचणीसाठी नोंदणीकृत विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा होईल. या परीक्षेत उच्चतम गुण मिळालेल्या १०० विद्यार्थ्यांची निवड सुपर ५० उपक्रमात सहभागी होण्यासाठी केली जाईल.

# कर्जत थेट नगराध्यक्ष उमेदवारीबाबत संभ्रम



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक दोन डिसेंबर रोजी होऊ घातली आहे.या निवडणुकीसाठी सोमवार पासून नामांकन अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे.मात्र महायुती, महाविकास आघाडी आणि नव्याने रिंगणात उतरण्याची शक्यता असलेली परिवर्तन आघाडी यांच्यापैकी एकाही आघाडीकडून थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर केले नाहीत. दरम्यान कर्जत शहराचे थेट नगराध्यक्षपद हे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव असल्याने उमेदवार यांच्याबाबत संभ्रम कायम आहे.**

जानेवारी २०२३ मध्ये मुदत संपलेल्या कर्जत नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा झाली आहे.या निवडणुकीसाठी २१ सदस्य आणि थेट नगराध्यक्ष निवडीसाठी दोन डिसेंबर रोजी निवडणूक होणार आहे.त्या पार्श्वभूमीवर सर्व राजकीय पक्षांच्या हालचाली यांना वेग आला आहे.मात्र थेट नगराध्यक्ष पदाचा उमेदवार बाबत कोणत्याही राजकीय पक्षाने जाहीर वाच्छता केलेली नाही.कर्जत नगरपरिषदेचे थेट नगराध्यक्ष पद हे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव झाल्याने त्या जागेसाठी सर्व राजकीय पक्ष सक्षम उमेदवार शोधण्याच्या मनस्थितीत आहे. कर्जत नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना आणि भाजप यांची युती राहण्याची शक्यता आहे.त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हे एकत्र येण्याची शक्यता आहे. तर अन्य पक्षदेखील निवडणुकीत उतरण्याची शक्यता असल्याने ही निवडणूक बहुरंगी होणार हे जवळपास नक्की आहे.मात्र निवडणुकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. कर्जत शहरात कोणताही राजकीय पक्ष आपल्या थेट नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार यांची घोषणा करू शकला नाही. शिवसेना आणि भाजपा यांच्या महायुतीमध्ये थेट नगराध्यक्ष पदाची जागा कदाचित भारतीय जनता पक्ष लढवण्याची शक्यता आहे.त्या ठिकाणी भाजप कडून अनेक उमेदवार यांची नावे समोर आली आहेत.चार इच्छुक यांनी आपल्या पक्षाकडे उमेदवारी देखील मागितली असून ऐनवेळी त्याशिवाय एखाद्या उमेदवाराचा विचार होऊ शकतो अशी राजकीय स्थिती युतीमध्ये निर्माण झाली आहे. माजी आमदार सुरेश लाड यांच्या सूनबाई यांना भाजप कडून रिंगणात उतरण्याचा आग्रह धरला जात आहे.पण लाड यांच्याकडून नकार दिला गेला असल्याची चर्चा असून शिवसेना आणि भाजपमधील थेट नगराध्यक्ष यांच्या उमेदवारीचा सस्पेस कधी संपणार याकडे विरोधी पक्षांचे डोळे लागले आहेत.

महायुती मधील घटक पक्ष असलेला राष्ट्रवादी काँग्रेस हा कर्जत विधानसभा मतदारसंघात शिवसेना ठाकरे पक्षाबरोबर निवडणुका लढणार आहे. दुसरीकडे शिवसेना ठाकरे पक्षाकडे सक्षम उमेदवार नसल्याने आयत्यावेळी अन्य पक्षातील बडा उमेदवार शिवसेना ठाकरे पक्षात प्रवेश करून उमेदवार होऊ शकतो.तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ही निवडणूक परिवर्तन आघाडी म्हणून लढणार असून या पक्षाकडे थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवार आहेत पण माथेरान आणि खोपोली नगरपरिषद यांचे थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस लढवणार असल्याचे बोलले जात असल्याने कर्जत शहरात शिवसेना ठाकरे पक्ष थेट नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.कोणत्याही राजकीय पक्षाने आपले उमेदवार जाहीर केले नाहीत आणि त्यामुळे ऐनवेळी राजकीय घडामोडी होण्याची शक्यता आहे. नगरपरिषदेचे थेट नगराध्यक्ष पद जनता कोणत्या पक्षाच्या हाती सोपवणार? याकडे उमेदवार यांच्यावर लक्ष लागून राहणार आहे.

# आंबा पीक विमा परताव्याची प्रतीक्षा

## कंपन्यांकडून विलंब झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आक्रोश

**। तळा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना गेल्या काही महिन्यांपासून पीक विम्याचा परतावा मिळालेला नाही. विमा रक्कम भरूनही आणि पिकाचे मोठे नुकसान सहन करूनही अजूनपर्यंत परतावा न मिळाल्याने शेतकरी बांधवांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. आमच्या हक्काचा पैसा कोण अडवत आहे, असा संतप्त सवाल शेतकरी संघटनांकडून उपस्थित केला जात आहे.

तळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी निवेदन देत हा गंभीर विषय तातडीने निकाली काढावा, अशी मागणी केली. त्यानंतर मंत्रालयात २८ ऑक्टोबर रोजी विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत तळा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत राऊत, उपाध्यक्ष रवींद्र मांडवकर, सचिव कैलास पायगुडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत तळा मंडळासाठी प्रती हेक्टरी ७३ हजार रुपये तर सोनसडे मंडळासाठी हवामान पुनर्पाहणी केल्यानंतर प्रती हेक्टरी ६८ हजार रुपये परतावा देण्याबाबत चर्चा झाली, मात्र विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी सोनसडे मंडळात मे महिन्यात पाऊस पडला नाही, असा दावा करत परतावा देण्यास टाळाटाळ केली. यावर शेतकऱ्यांनी ठोस पुरावे दाखवत, मे आणि त्यानंतरही सलग पाऊस झाला होता, असा युक्तीवाद केला. शेतकरी संघटनेने स्पष्ट केले की, तालुक्यात बसवलेली हवामान यंत्रे नीट कार्यरत नसल्याने चुकीचा डेटा तयार होतो आणि त्यावर आधारित विमा कंपन्या परतावा थांबवतात. दरवर्षी हाच प्रकार घडतो. आमच्यासाठी ही योजनेचा काय उपयोग, असा सवाल संतप्त शेतकऱ्यांनी केला.

### ३० नोव्हेंबर शेवटची तारीख

**शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांवरही दुर्लक्षेचा आरोप केला आहे. अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे आणि विमा कंपन्यांच्या आडमुठेपणामुळे शेतकऱ्यांच्या श्रमाचे मोल मिळत नाही. आता आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही, अशी चेतावणी तळा तालुक्यातील आंबा उत्पादकांनी दिली. २०२५-२६ हंगामासाठी आंबा पीक विमा भरण्याची शेवटची तारीख ३० नोव्हेंबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे, मागील हंगामाचा परतावा अजूनही मिळालेला नसल्याने शेतकऱ्यांचा संयम सुटत चालला आहे.**



# भवानी मातेच्या मंदिरासाठी साऊंड सिस्टीम भेट

**। उरण । प्रतिनिधी ।**

पाले गावात आई भवानी मातेच्या मंदिरात ग्रीन प्रॉपर्टी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून या कंपनीचे मालक जय सोनी, भूषण खैरनार यांच्या माध्यमातून अनिल पाटील यांच्या सहकार्याने आई भवानी मातेच्या मंदिरात साऊंड सिस्टमचे भेट देण्यात आले. यावेळी ग्रामस्थ व उपस्थित मान्यवरांनी त्यांचे आभार मानले. हनुमान म्हात्रे, बलदिन म्हात्रे, अतिश म्हात्रे, उमेश पाटील, गाव अध्यक्ष अमित म्हात्रे,नितेश गावंड, चंद्रकांत म्हात्रे, माजी सरपंच वैभवी म्हात्रे, योजना म्हात्रे, माधुरी म्हात्रे, पार्वती म्हात्रे, संगीता म्हात्रे, रामकृष्ण म्हात्रे, हर्षल म्हात्रे, मीत म्हात्रे आदी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# अलका भुजबळ यांना रापा पुरस्कार

**श्रीवर्धन :** न्यूज स्टोरी टुडे पोर्टल च्या निर्मात्या अलका भुजबळ यांना उत्कृष्ट पोर्टल निर्मात्या म्हणून रापा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कार वितरण समारंभ राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ चित्रपट निर्माते दिग्दर्शक किरण शांताराम आणि ज्येष्ठ चित्रपट तंत्र तज्ञ उज्ज्वल निरगुडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे प्रदान करण्यात येणार आहे.

अलका भुजबळ यांना या पोर्टलच्या उत्कृष्ठ निर्मितीसाठी यापूर्वी सावित्रीबाई फुले महिला गौरव पुरस्कार, माणुसकी गौरव पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

पान १ वरून

## सोमवारी महाड बंदचा इशारा!

(शरद पवार गट) आणि इतर सामाजिक संस्था सहभागी होतील, असा विश्वास अविनाश जाधव यांनी व्यक्त केला. या प्रकरणी महाड शहर पोलिसांनी माजी सभापती सपना मालुसरे यांच्यासह सात जणांवर गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) नेते अविनाश जाधव यांनी महाडमध्ये एका घटनेचा निषेध करण्यासाठी सोमवारी बंद पुकारल्याचे जाहीर केले. त्यांनी महाडमधील नागरिक आणि व्यापाऱ्यांना या बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. अविनाश जाधव यांनी महाड पोलिसांवर राजकीय दबावाखाली काम करत असल्याचा आरोप केला. महाड शहर पोलीस ठाण्याला भेट देण्यापूर्वी अविनाश जाधव यांनी पंकज उमासरे यांच्या दुकानाला भेट देऊन घटनेची माहिती घेतली. यावेळी त्यांच्यासोबत मनसेचे प्रमुख पदाधिकारी संजय नाईक, योगेश चिले, चेतन उतेकर, तसेच उबाठाचे चेतन पोटफोडे शिरगाव सरपंच सोमनाथ ओझर्डे आदी मान्यवर उपस्थित होते. पोलीस ठाण्यात पंकज उमासरे यांच्या कुटुंबीयांनी आरोपींच्या महाडमधील विविध कार्यक्रमांमधील सहभागाचे छायाचित्र पोलिसांना दाखवले. मनसेने लेखी पत्राद्वारे या गुन्ह्याप्रकरणी विकास गोगावले यांना १०९ कलमांतर्गत अटक करण्याची मागणी केली आहे. ही घटना महाड शहर पोलीस ठाण्यामधील उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे आणि पोलीस निरीक्षक रमेश तडवी यांच्यासमोरच घडली.

## रायगडात ४ हजार १५६ दुबार मतदार

होणाऱ्या मतदान प्रक्रियेमध्ये २ लाख ३७ हजार ५०३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये खोपोली, ६२ हजार ७४, अलिबाग १६हजार ३५४, श्रीवर्धन १२ हजार ६३७, मुरूड जंजिरा ११ हजार ५४४, रोहा १७ हजार ६६९, महाड २३ हजार १२४, पेण ३३ हजार ८७५, उरण २६ हजार २१४, कर्जत २९ हजार ९५७ आणि माथेरान नगर परिषदेमध्ये ४ हजार ५५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

## हक्काच्या नगदी पिकांवर संकट

लागवडीला उशीर होणार आहे. त्याचे उत्पन्न देखील कमी असेल. ही सर्व कडधान्य पिके शेतकऱ्यांना रोख उत्पन्न देतात. परिणामी आता शेतकऱ्यांना नुकसानीला व अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. विशेष म्हणजे लोकप्रिय पोपटीचा सीझनही पुढे सरकला आहे. यामुळे खवय्ये नाराज झाले आहेत.

### कडधान्य पिकाला फटका

मात्र परतीच्या पावसामुळे हजारो एकर शेतजमीन पाण्याखाली गेल्यामुळे कडधान्य पिकांना देखील धोका आहे. भात शेतीत मोठ्या प्रमाणात पाणी साठले असल्यामुळे शेतकऱ्यांना कडधान्य पिकासाठी मशागत करणे आणि कडधान्याची लागवड करणे आता तरी शक्य नाही. त्यामुळे कडधान्य पिकांना फटका बसला आहे. त्यामुळे यंदा कडधान्याचे पिक कमी येण्याची शक्यता कृषी तज्ञांकडून वर्तवली जात आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली

पावसाळ्यामुळे पूल अधिक असुरक्षित झाल्याने वाहनचालकांनी व ट्रान्सपोर्ट संस्थांनी प्रशासनाच्या आदेशाचे काटेकोर पालन करावे. अपघात टाळण्यासाठी व जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कार्यवाही करण्यात आली असल्याचे लेखी आदेश काढण्यात आले होते. पुढील आदेश येईपर्यंत बंदी लागू राहणार असून, नियमभंग करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी स्पष्ट केले होते. अलिबाग-रोहा मार्गावरील नवघर, सुडकोली, नवेदरबेली, सहाण पाल्हे येथील धोकादायक पुलांवरून कंपन्यांच्या मोठमोठ्या गाड्यांसह काही खासगी ट्रक, डंपरसारखी अवजड वाहने पहाटेच्या वेळी तसेच रात्रीच्यावेळी खुलेआमपणे ये-जा करीत आहेत. अलिबाग तालुक्यातील वढाव - खानाव मार्गावरील पुलाची क्षमता १२ टनापर्यंत असताना या पुलावरून त्याहून अधिक वजनाची कंपनीची वाहने बिनधास्तपणे धावत होती. त्यामुळे वढाव येथील पूल (साकव) सोमवारी सायंकाळी कोसळला. त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून येथील प्रवाशांची वणवण सुरु आहे. वाहतूक दोन्ही मार्गावरून बंद झाल्याने पर्यायी मार्ग म्हणून गाव, गल्ल्यांतून ये-जा करण्याची वेळ चालकांसह प्रवाशांवर आली आहे.

वढाव येथील पुलाची दुर्घटना घडूनही नवेदर बेली, सहाण-पाल्हे तसेच नवघर पुलावरून आजही अवजड वाहने धावत आहेत. वाहतूक पोलिसांनी बॅरिकेट लावून अवजड वाहनांना बंदी असल्याच्या सूचना देऊनही अवजड वाहने या रस्त्यावरून ये-जा करीत आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची पायमल्ली अवजड वाहन चालकांकडून होत आहे. याकडे मात्र प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांचे अवजड वाहतूक बंदीचे आदेश फक्त कागदावर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. रोहा मार्गावरील रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. वढाव येथील पूल कोसळल्यानंतर रोहा व अलिबाग मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. त्यामुळे वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला आहे. त्याचा फटका भाजी विक्रेत्यांपासून, शाळा महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी, नोकरी, व्यवसायानिमित्त जाणाऱ्या कामगारांना बसला आहे. पर्यायी रस्ता म्हणून काही गावांतील गल्लीतून रस्ता काढण्याची वेळ स्थानिकांवर आलीआहे. त्यामुळे प्रवाशांची वणवण संपेना असे चित्र दिसून येत आहे.

अलिबाग - रोहा रस्ता त्रासदायक अलिबाग ते साईपर्यंत ८५ किलोमीटरचा रस्ता २०१९ पूर्वी मंजूर झाला होता. या रस्त्याच्या कामासाठी १७७ कोटी रुपये मंजूर झाले होते. नारळफोडीनंतर मागील तीन वर्षापासून प्रत्यक्षात रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. मात्र या कामाचा दर्जा निकृष्ट असून ठिकठिकाणी खड्डे, अपूर्ण पूल, अशा अनेक समस्यांना स्थानिकांना सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे हा रस्ता स्थानिकांसाठी त्रासदायक ठरला आहे.

## कर्जमाफी नाही, तोपर्यंत मत नाही असे बोर्ड लावा

सरकारवर जोरदार टीका केली. तसेच, जूनची कर्जमाफी आम्हाला मान्य नाही. जोपर्यंत कर्जमुक्ती नाही, तोपर्यत सरकारला मत नाही हे बोर्ड लावा, निश्चय करून टाका आणि सगळीकडे बोर्ड लावा, असे आवाहन ठाकरेंनी शेतकऱ्यांना केलंय. धाराशिव येथे शेतकऱ्यांशी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, तुम्ही शेतकरी आहात ना? नाहीतर सरकारचे लोक म्हणतील मुंबईतून लोक आणली आणि टोप्या घालून बसवली. मला सभा घ्यायची नाहीय, मी तुमच्याशी बोलायला आलोय. मुख्यमंत्री म्हणाले इतिहासतली सगळ्यात मोठी मदत आहे, पण ही इतिहासातील सगळ्यात मोठी थाप आहे. तुमच्या पॅकेजला खेकड्याने भोक पाडली का? पॅकेजचं काय झालं? मदत का मिळाली नाही? अशी टीका उद्धव ठाकरेंनी धाराशिव दौऱ्यातून सरकारवर केली. विमा कंपन्याना सांगतो की, शेतकऱ्यांची सगळी रक्कम द्या, नाहीतर हे सगळे तुमच्या ऑफिसवर येतील. फसल योजनेमध्ये तुम्हाला फसवलं आहे. फसलमध्ये फसवलं आहे. लाडकी बहीणमध्ये सगळ्यांना पैसे मिळत होते आता कुटुंबातील दोघांनाच पैसे मिळत आहेत. केंद्राचं पथक आलंय, तुम्ही पाहिलं का? सगळं झाल्यानंतर महिन्यानंतर हे पथक पाहणी काय करणार? केंद्राचा पथक दाखवा आणि १०० रुपये मिळवा असे बोर्ड दाखवा. शेतकरी एकदा उसळला तर तुमचं सिंहासन जाळून खाक केल्याशिवाय राहणार नाही. जोपर्यंत कर्जमुक्ती नाही, तोपर्यत सरकारला मतं नाही हे बोर्ड लावा, असे आवाहनही उद्धव ठाकरेंनी शेतकऱ्यांना केले.

## फळपीक विमा तातडीने मिळावा

विभागाच्या माहितीच्या अधारे पुन्हा तपासणी करून अचुक विमा रक्कम निश्चित करावी. विमा शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही करावी, असे पुणे येथील नियोजन व प्रक्रिया कृषी आयुक्तालयाचे संचालक यांनी १७ ऑक्टोबरला दिलो आहे. मात्र वीस दिवस उलटूनही कंपनीकडून कार्यवाही झाली नसल्याचा आरोप संघाकडून करण्यात आला आहे.

२०२१ ते २०२४ या तीन वर्षाच्या कालावधीत सिंधूदुर्ग जिल्ह्याला हेक्टरी सात हजार रुपये व रायगड जिल्ह्याला २९ हजार ४०० रुपये म्हणजे चारपट अधिक प्रिमिअम (हप्ता) होता. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला होता. त्याचा परिणाम जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा या योजनेत अत्यल्प सहभाग होता.मागील वर्षी सिंधूदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्याच्या तुलनेने दुप्पट प्रिमिअम होता. त्यामुळे जिल्ह्यातील ५६ हजार शेतकऱ्यांपैकी फक्त पाच हजार २३५ शेतकऱ्यांनी तीन हजार ९८१ हेक्टर इतक्या क्षेत्रासाठी विमा उतरविला होता. तेदेखील पैसे मिळण्यास दिरंगाई का असा सवाल शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे. रायगड व पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आंबा फळपीक विमा नुकसानभरपाई तातडीने मिळावी, अशी मागणी चंद्रकांत मोकल यांनी केली आहे.


**जाहीर सूचना**

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक पंढरीनाथ चंदर पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-परहुरपाडा, तालुका -अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थितभूमापन क्रमांक व उपविभाग ८, एकूण क्षेत्र ००-१८-३०(हे.आर.चौ.मी.) आकार रु.पै.३.६२/-.

ठिकाण: अलिबाग
दिनांक : /११/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**



**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग**
**मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात, अलिबाग - ४०१२०१**
दुरध्वनी क्र. ०२१४१ २२२४२८, Email: dslrraigad@gmail.com

क्र.अपील/एस.आर.१९/२०२५/ता.रोहा/जि.रायगड २०२५/२१८५ अलिबाग दिनांक ०४/११/२०२५

जाहिर नोटीस
प्रति,
१. बेबी नारायण सानप — अपिलदार
उर्फ सुनिता उमाजी जाधव
रा. मु. पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड

**विरूद्ध**

१. उप अधीक्षक भूमि अभिलेख, रोहा — जाबदार
ता. रोहा, जि. रायगड
२. लक्ष्मण तुलाजी दळवी (मयत) तर्फे वारस
पांडुरंग लक्ष्मण दळवी (मयत) तर्फे वारस
२/१. मधुकर पांडुरंग दळवी — २/२. गुणाजी पांडुरंग दळवी (ए.कु.पु)
रा. मु. पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड
२/३. रुक्मीणी पांडुरंग दळवी (मयत) — २/४. विठाबाई विठोबा जवरत
रा. मु. पो. देवकान्हे, ता. रोहा, जि. रायगड
३. महादेव दामा दळवी (मयत) तर्फे वारस
३/१. काशी हरीश्चंद्र शेलार (मयत) तर्फे वारस — ३/१/२. गणेश हरिश्चंद्र शेलार
३/१/१. धर्मा हरिश्चंद्र शेलार
३/१/३. रोहिदास हरिश्चंद्र शेलार
३/१/१ ते ३/१/३ रा. मु. सांगडे, पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड
३/१/४. रेश्मा नथुराम बामणे
रा. मु. पो. देवकान्हे, ता. रोहा, जि. रायगड
३/१/५. जयश्री जगन्नाथ गायकवाड
रा. मु. पो. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड
३/२. हशी मारुती कदम (मयत) तर्फे वारस
३/२/१. साधुराम मारूती कदम — ३/२/२. संजय मारुती कदम
३/२/३. गुलाब ज्ञानदेव भोकटे
३/१/१ ते ३/१/३ रा. मु. गावठाण, पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड
३/३. धर्मी शंकर बलकावडे
रा. मु. सोनगाव, पो. पिंगळसई, ता. रोहा, जि. रायगड
३/४. सोनी पंढरी बळकावडे (मयत) तर्फे वारस
३/४/१ प्रमोद पंढरी बामुगडे
रा. मु. किल्ला, ता. रोहा, जि. रायगड
३/४/२. रुक्मीनी विठोबा भाटक
रा.मु.धाटाव, ता. रोहा, जि. रायगड
३/४/३. प्रमिला उमेश शिंदे
रा. मु. किल्ला, ता. रोहा, जि. रायगड
३/५. मनी महादेव दळवी (मयत)
३/६. नरेश महादेव दळवी
३/७. कृष्णा महादेव दळवी
क्र. ३/६ व ३/७ रा. मु. पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड
३/८. चंद्रकला चंद्रकांत गोवर्धने
रा. मु. पो. मेढा, ता. रोहा, जि. रायगड
४. निरा दगडु महार उर्फ जाधव (मयत) तर्फे वारस
४/१. तुळशीराम दगडु जाधव — ४/२. पार्वती रघुनाथ शिंदे
४/३. ताराबाई रघुनाथ शिंदे — ४/४. प्रभावती विठ्ठल सोनावणे
क्र. ४/१ ते ४/४ रा. मु. पो. धामणसई ता. रोहा, जि. रायगड
५. गणपत सहादेव पोटफोडे (मयत) तर्फे वारस
चिंदु गणपत पोटफोडे.
रा. मु. पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड

**विषय :-** मौजे धामणसई, ता. रोहा, जि. रायगड येथील गट नं. २६६ ते २७० या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.
**संदर्भ :-**१. अर्जदार बेबी नारायण सानप उर्फ सुनिता उमाजी जाधव यांचा दिनांक १३/०२/२०२४ रोजीचा अपील अर्ज.
२. इकडील पत्र क्र. अपील क्र.१९/२०२५/जा. क्र. २१६० दिनांक १७/१०/२०२५

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरण दाखल करुन घेणेकामी सुनावणीची तारीख १५.०७.२०२५ २९.०७.२०२५, १२.०८.२०२५, २६.०८.२०२५, १६.०९.२०२५, २३.०९.२०२५, ३०.०९.२०२५, ०७.१०.२०२५, १४.१०.२०२५, २८.१०.२०२५ व ०४.११.२०२५ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख १७/११/२०२५ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी सकाळी/दुपारी ११.०० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु.अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजून आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/११/२०२५
सही/-
**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**रायगड, मु. अलिबाग,**



**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग
मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात अलिबाग-४०२२०१
दूरध्वनी क्र. ०२१४१ २२२४२८, Email : dslrraigad@gmail.com

क्र.अपील/एस.आर./४९/२०२५/ता. तळा, जि. रायगड/२०२५/२१८८ अलिबाग दिनांक ०४/११/२०२५

जाहीर नोटीस
प्रति,
महादेव लक्ष्मण जोशी मयत तर्फे वारस — अपिलदार
१. श्रीम. सविता महादेव जोशी
मु.पो. तळा, ता. तळा, जि. रायगड
२. श्रीम. स्मिता सदानंद भंडारे,
मु. १०८७ ए, स्वरांगण, वैभवनगर, चेंढरे,
रॉयल मोटार ट्रेनिंग स्कूल जवळ,
ता. अलिबाग, जि. रायगड

विरूद्ध — जाबदार

१. उपअधीक्षक भूमि अभिलेख, तळा
ता. तळा, जि. रायगड
२. गणेश भास्कर गोविलकर मयत तर्फे वारस
२/१ श्री. प्रभाकर गणेश गोविलकर
२/२ श्री. मुकुंद गणेश गोविलकर
२/३ श्री. मनोहर गणेश गोविलकर
२/४. मधुकर गणेश गोविलकर मयत तर्फे वारस
२/४/१. श्रीम. मालती मधुकर गोविलकर
२/४/२ श्री. मारूती मधुकर गोविलकर
२/४/३ श्री. मिलिंद मधुकर गोविलकर
२/४/४ श्रीम. संगिता विवेक पाटील
३. रामचंद्र भास्कर गोविलकर मयत तर्फे वारस
३/१ श्रीम. प्रमिला रामचंद्र गोविलकर
३/२ श्री सतिष रामचंद्र गोविलकर
३/३ श्री. नितीन रामचंद्र गोविलकर
४. सुशीला वामन गोविलकर मयत तर्फे वारस ४/१ श्रीम. शामला वामन आठल्ये
४/२ सुविधा गंगाधर उपाध्ये
५. श्री. वसंत भिकाजी गोविलकर
६. श्री. महादेव भिकाजी गोविलकर
७. श्री. शरद भिकाजी गोविलकर
क्र. २/१ ते ७ मु.पो. तळा, ता. तळा, जि. रायगड

विषय : मौजे तळा, ता. तळा, जि. रायगड येथील सि.स.नं. ७४८ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत
संदर्भ : १. अर्जदार श्रीम सविता महादेव जोशी व इतर यांचा दिनांक ०४/१०/२०२४ रोजीचा अपील अर्ज
२. इकडील पत्र क्र. अपील क्र. ४९/२०२५/जा.क्र. २१५१ दिनांक १५/१०/२०२५

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरण दाखल करून घेणेकामी सुनावणीची तारीख २६.०८.२०२५, १६.०९.२०२५, २३.०९.२०२५, ३०.०९.२०२५, ०७.१०.२०२५, १४.१०.२०२५, २८.१०.२०२५ व ०४.११.२०२५ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहीर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख १७/११/२०२५ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी सकाळी/दुपारी ११.०० वाजता आपण पुराव्याचे मूळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजून आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/११/२०२५
सही/-
**(सुनील इंदलकर)**
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख
रायगड, मु. अलिबाग



**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग
मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात अलिबाग-४०२२०१
दूरध्वनी क्र. ०२१४१ २२२४२८, Email : dslrraigad@gmail.com

क्र.अपील/एस.आर./२२/२०२५/ता. महाड, जि. रायगड/२०२५/२१८९ अलिबाग दिनांक ०४/११/२०२५

जाहीर नोटीस
प्रति,
कै. महादेव विनायक पत्की मयत तर्फे वारस — अपिलदार
१. श्री. आनंदकुमार महादेव पत्की
मु. १/१२-१२, लक्ष्मी बिल्डींग, डॉ.एम.सी. जावळे मार्ग,
दादर, दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८

विरूद्ध — जाबदार

१. उपअधीक्षक भूमि अभिलेख, महाड
ता. महाड, जि. रायगड
२. सूर्यकांत केशव देशपांडे मयत तर्फे वारस
२/१ श्री. मनोज सूर्यकांत देशपांडे
२/२ श्री. रोमेश सूर्यकांत देशपांडे
२/३ श्रीमती मेघना अमोणकर
३. चंद्रकांत केशव देशपांडे मयत तर्फे वारस
३/१ श्री. निलेश चंद्रकांत देशपांडे
३/२ श्रीमती नोमिता हजारनिस
क्र. २/१ ते ३/२ दोहो, मु. १०१, डेल हाऊस, ७ सेंट्रल अॅव्हेन्यु, सांताक्रुझ, मुंबई ४०००५४
४. चेतनकुमार गजानन रत्नपारखी मयत तर्फे वारस
४/१ श्रीमती कल्पना चेतनकुमार रत्नपारखी
४/२ श्री. विनय चेतनकुमार रत्नपारखी
४/३ सौ. तृप्ती राकेश पाटील
४/४ सौ. आरती रवी पन्हाळकर
४/५ सौ. स्वप्नाली मंदार पोतदार
सर्व मु.पो. महाड, ता. महाड, जि. रायगड
५. श्री. प्रभाकर गजानन रत्नपारखी
६. श्री. शैलेश गजानन रत्नपारखी
रा.मु.पो. महाड, ता. महाड, जि. रायगड
७. श्री. रमेश लक्ष्मण पवार
मु. कोटेश्वरी तळे, महाड, पो. महाड, ता. महाड, जि. रायगड

विषय : मौजे महाड, ता. महाड, जि. रायगड येथील सि.स.नं. २८५६ ते २८५९ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत
संदर्भ : १. अर्जदार श्री. आनंदकुमार महादेव पत्की यांचा दिनांक १८/०४/२०२४ रोजीचा अपील अर्ज
२. इकडील पत्र क्र. अपील क्र. २२/२०२५/जा.क्र. २१५९ दिनांक १७/१०/२०२५

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरण दाखल करून घेणेकामी सुनावणीची तारीख १५.०७.२०२५, २९.०७.२०२५, १२.०८.२०२५, २६.०८.२०२५, १६.०९.२०२५, २३.०९.२०२५, ३०.०९.२०२५, ०७.१०.२०२५, १४.१०.२०२५, २८.१०.२०२५ व ०४.११.२०२५ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहीर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख १७/११/२०२५ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी सकाळी/दुपारी ११.०० वाजता आपण पुराव्याचे मूळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजून आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**(सुनील इंदलकर)**
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख
रायगड, मु. अलिबाग
ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/११/२०२५

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



## श्रीवर्धनमधील किनाऱ्याला गाळाचे ग्रहण

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धनमधील जीवना बंदर या ठिकाणी नवीन जेट्टी विकसित करण्यात येत आहे. या जेट्टीच्या कामासाठी खूप मोठ्या प्रमाणावर दगडांचा भराव करण्यात आल्याने समुद्राच्या पाण्याने आपला प्रवाह बदलला आहे. त्यामुळे जीवनाबंदर जुनी जेट्टी व खालचा जीवना हा परिसर पूर्णपणे वाळूने भरून गेला आहे. तसेच, फेस्टिवल बीच, शासकीय विश्रामगृह तसेच दांडे स्मशानभूमी या परिसरातील किनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर मोठ्याप्रमाणात लाटा आदळत आहेत. गेल्या एक महिन्यापासून ओहोटीला देखील पाणी मागे हटत नव्हते. परिणामी श्रीवर्धन समुद्रकिनारी कोणत्याही प्रकारचे वॉटर स्पोर्ट्स पाणी मागे जात नसल्याने उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत होती. पौर्णिमा असल्यामुळे समुद्राला मोठी भरती व ओहोटी येते. सायंकाळच्या वेळेस ओहोटी असल्याने समुद्राचे पाणी काही अंशी मागे गेलेले पाहायला मिळाले. परंतु, मागील आठवड्यात समुद्र खवळलेला असल्यामुळे व अरबी समुद्रामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे पाण्याची पातळी अजिबात कमी होत नव्हती. यासाठी दांडे परिसरातील खाडीचे तोंड खोल करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# गुन्हे शाखेची कारवाई

- ऑनलाइन जुगारावर सर्जिकल स्ट्राईक
- ३५ जणांवर गुन्हा दाखल



। चणेरा । प्रतिनिधी ।

मोबाईलच्या माध्यमातून ऑनलाइन गेमिंगद्वारे जुगार खेळणाऱ्या टोळीवर अलिबाग स्थानिक गुन्हे शाखेच्यावतीने मोठी आणि नियोजनबद्ध कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ३५ जणांवर गुन्हा दाखल केला असून, एक मोबाईल फोन आणि ३ हजार १८० रोख रक्कम असा एकूण १८ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे व पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या देखरेखीखाली करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, रोहा-अष्टमी मार्गावरील योगेश्वरी रसवंतीगृहाजवळ आडोषाला संभे येथील नितेश सानप याचा इतरांकडून ऑनलाईन पैसे स्वीकारून फनगेम आणि फनरेप या मोबाईल ॲप्सच्या माध्यमातून ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली जुगाराचा गोरस धंदा सुरू होता, अशी माहिती रायगड स्थानीक गुन्हे अन्वेशण षाखेचे मोरेश्वर उमले यांना मिळाली होती. त्यांच्या पथकाने तातडीने कारवाई केली आणि रोहा तालुक्यातील विविध ठिकाणी छापे टाकून जुगाराचा मोठा प्रकार उघडकीस आणला. दरम्यान, नितेश सानपकडे पोलिसांनी अधिक चौकशी केली असता त्याच्या मोबाईलमधील फेअरडील या व्हाट्सअप ग्रुपमधील ३३ सदस्य देखील ऑनलाइन जुगार चालवीत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या जुगार प्रकरणात नितेश सानप सह शिल्पेश पोवाळे (अलिबाग), शिवाजी पवार (रोहा) असे एकूण ३५ आरोपी या ऑनलाइन जुगार नेटवर्कमध्ये सहभागी असल्याचे निश्पन्न झाले. यावेळी पोलिसांनी त्यांच्याकडून मोबाईल व रोख रक्कम रुपये ३ हजार १८० असा एकूण १८ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या आरोपींनी मोबाईल ॲपच्या माध्यमातून ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली लोकांकडून पैसे घेऊन जुगार खेळवला असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील हे करीत आहेत.

तपासात आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याची षक्यता वर्तवण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे. या कारवाईत स्थानीक गुन्हे शाखा अलिबाग येथील पोलीस अधिकाऱ्यांनी उत्तम समन्वय व परिश्रमाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी धाडसी पद्धतीने छापे टाकून आरोपींना पकडण्यात आणि पुरावे गोळा करण्यात मोलाचे योगदान दिले. रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या नेतृत्वाखाली झालेली ही कारवाई जिल्ह्यात वाढत्या ऑनलाइन जुगार प्रकरणांवर प्रभावी नियंत्रण ठेवणारी ठरली आहे.

### बेकायदेशीर कृत्यांवर ‘रायगड दृष्टी’

रायगड पोलिसांनी नागरिकांना गुन्हेगारी आणि बेकायदेषीर कृत्यांविरुद्ध सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच, नागरिकांना थेट पोलिसांशी संवाद साधता यावा म्हणून ‘रायगड दृष्टी’ व्हॉट्सॲप चॅटबॉट हि नवीन सेवा सुरू करण्यात आली आहे. रायगड ड्यूटी व्हॉट्सॲप चॅटबॉट क्रमांक ९६२००३२३२३ हा असुन या चॅनेलद्वारे नागरिक आपल्या परिसरातील मटका, जुगार, अंमली पदार्थ, अवैध दारू व्यापार किंवा अन्य बेकायदेशीर कृत्यांविषयीची माहिती थेट पोलिसांना देऊ शकतात. नागरिकांनी दिलेली माहिती पूर्णतः गोपनीय ठेवली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### पोटासाठी चिमुकल्या पायांची कसरत..



● पनवेल येथील ठाणा नाका येथे डोंबारी मुलांचे शाळेत जाण्याचे वय असतानाही दोरीवर उभे राहून साहसी खेळ सादर केले जात आहेत. (छायाचित्र: राजेश डांगळे)

# शिलार धरणाला शेतकऱ्यांचा विरोध

### रायगड जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील प्रास्तवित शिलार येथील धरणाला त्या भागातील शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. धरण होणार असलेल्या भागातील तीन ग्रामपंचायतींमधील ग्रामस्थांनी आणि शेतकऱ्यांनी ग्रामसभेत धरणाला विरोध केला आहे. या धरणाच्या विरोधातील ठराव रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला असून शासनाने धरण बांधू नये, अशी मागणी या निवेदनात केली आहे.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडून शिलार धरण उभारले जाणार आहे. या धरणाला त्या धरण क्षेत्रातील ग्रामस्थांनी विरोध केला आहे. त्या भागातील बाधित गावातील शेतकऱ्यांनी आपल्या भावना ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत मोकळ्या केल्या आहेत. त्यानुसार बाधित शेतकऱ्यांनी ३१ ऑक्टोबर रोजी झालेल्या ग्रामसभेत घरे, शाळा, देवस्थाने, स्मशानभूमी, दफनभूमी, झाडे, नदी, नाले व डोंगरावरच्या टेकड्या अषा अनेक सजीव निर्जीव वास्तू त्याच्या प्रत्यक्षात साक्षीदार आहेत. त्यामुळे या भूभागाशी आमचे भावनिक नाते आहे. तेव्हा आम्हाला आमच्या या मायभूम ीपासून दूर करून विस्थापित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तो निर्णय शासनाने त्वरित रद्द करावा, असा ठराव ग्रामस्थांनी एकमताने मंजूर केला आहे. हा ठराव स्थानिक शेतकरी दिनेष रसाळ यांच्या माध्यमातून रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांना देऊन धरण रद्द करावे, अशी मागणी केली आहे.


## निवडक



### तळ्यातील आठवडा बाजाराला सुरुवात

**तळा :** तळा तालुक्यातील षहरात एकमेव आठवडा बाजार बुधवारी भरत असुन लांबलेल्या पावसाळ्यानंतर दर बुधवारी बाजार भरणे सुरू झाले आहे. त्यामुळे बाजारात गर्दी पहावयास मळित आहे. यावेळी कांदा, बटाटे, खरेदीकडे ग्राहकांचा अधिक कल दिसून येत आहे. त्यातच भाजीपाल्याचे भाव गगनाला भिडले असतानाही या आठवडा बाजारात अनेक भाज्यांचे भाव हे कमी दराने असल्याने ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात खरेदी केला जात आहे. या बाजारात सुकी मच्छी नेहमीच मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येत असते. सुक्या मच्छीच्या खरेदीसाठी तालुक्यातील ग्राहक आवर्जून येतात. याबाबत बाजारातील व्यापाऱ्यांना विचारले असता मागील बाजारापेक्षा यावेळी बाजारात ग्राहक अधिक प्रमाणात खरेदीसाठी येत आहेत. तसेच, सर्वच प्रकारचा माल खरेदी करण्याकडे ग्राहकांचा ओढा असल्याचे त्यांनी सांगितले.

### पांडूरंग पेरेकर यांचे निधन



**रायगड :** अलिबागमधील कोळीवाड्यातील पांडुरंग एकनाथ पेरेकर यांचे मंगळवारी (दि.४) निधन झाले. निधनासमयी ते ६० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुन असा परिवार आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका राजेश्री पेरेकर यांचे ते पती होतं. पांडूरंग पेरेकर यांच्या निधनामुळे पेरेकर कुटुंबामध्ये शोककळा पसरली आहे. पांडूरंग पेरेकर हे सीमा शुल्क विभागात (कस्टम) नोकरीला होते. काही महिन्यांपूर्वी ते सेवानिवृत्त झाले. मंगळवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. अलिबाग कोळीवाडा येथील स्मशानभूमीमध्ये त्यांच्या पार्थिवार दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल चोपडा, अश्वीनी पाटील, संजना कीर, इंद्रनील नाईक, राकेश चौलकर, रवी थोरात, अशोक प्रधान, आनंद बुरांडे आदी राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी, साखर व अलिबाग कोळीवाड्यातील कोळी बांधव, नातेवाईकांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांचे उत्तरकार्य रविवारी (दि.१६) राहत्या घरी होणार असल्याची माहिती पेरेकर कुटूंबियांकडून देण्यात आली.

### एकता परेडला सविता गर्जे यांचे नेतृत्व

**तळा :** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि राष्ट्रीय एकता दिनाच्या पार्श्वभूमीवर गुजरात मधील केवाडिया येथे संपन्न झालेल्या भव्य राष्ट्रीय एकता परेडची सलामी देण्यात आली. या परेडमध्ये महाराष्ट्र पोलीस दल अर्धसैनिक बल पथ संचलनाचे नेतृत्व प्लाटून कमांडर श्रीवर्धन-म्हसळा उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांनी केले. त्यामुळे हा केवळ श्रीवर्धन-म्हसळाचाच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्हा पोलीस दलासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. सविता गर्जे यांनी अनेक गुन्ह्यांचा उलगडा केला असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अखत्यारीत गुन्ह्यांचे प्रमाण खूप कमी झाले आहे. दोन्ही तालुक्यातून सविता गर्जे यांचे कौतुक होत आहे.




# वढाव पुलाचे काम पुर्ण



### आजपासून पुल वाहतूकीस होणार खुला

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रेय**

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग-रोहा मार्गावरील वढाव-खानाव येथील पुल (साकव) सोमवारी सायंकाळी कोसळला. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. एसटी बस सेवासह इतर सेवेवर त्याचा परिणाम झाला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने युध्दपातळीवर या पुलाचे काम केले. अखेर हे काम ३० तासानंतर पुर्ण झाले असून गुरुवारपासून हा पूल वाहतूकीस खुला होणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली.

अलिबाग-रोहा मार्गावरील वढाव येथील पुल सोमवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास कोसळला. अचानक पुल कोसळल्याने रोहा व अलिबाग मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. या घटनेची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाला मिळाल्यावर मंगळवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक आदींनी घटनास्थळी धाव घेतली. पुलाची पाहणी करीत सर्व माहिती घेतली. वाहतूकीसाठी महत्वाचा असलेल्या पुलाची दूरूस्ती करण्याची कामगिरी युध्दपातळीवर सुरु करण्यात आली. क्रेनच्या मदतीने पुलावरील कोसळलेला भाग काढण्यात आला. तो परिसर स्वच्छ करून त्याठिकाणी मोठे पाईप टाकण्यात आले. माती खडी टाकण्यात आली. मंगळवारी सायंकाळी सुरु झालेल्या कामाला गती मिळाली. बुधवारी सायंकाळपर्यंत हे काम अंतिम टप्प्यापर्यंत सुरु होते. गुरुवारपासून वाहतूकीस पुल खुला केला जाणार असल्याची माहिती मोनिका धायतडक यांनी दिली.

अवघ्या काही तासात पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने केल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले आहे. या पुलावरून अवजड वाहनांना प्रवेश बंद असणार आहे. त्यामुळे कोणतीही अवजड वाहने या पुलावरून घेऊन जाऊ नये, असे आवाहन कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी दिली.

रोहा मार्गावरील रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डयांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. वढाव येथील पुल कोसळल्यानंतर रोहा व अलिबाग मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. त्यामुळे वाहतूकीवर त्याचा परिणाम झाला आहे. त्याचा फटका भाजी विक्रेत्यांपासून, शाळा महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी, नोकरी, व्यवसायानिमित्त जाणाऱ्या कामगारांना बसला आहे. पर्यायी रस्ता म्हणून काही गावांतील गल्लीतून रस्ता काढण्याची वेळ स्थानिकांवर आली आहे. त्यामुळे प्रवाशांची वणवण संपेना, असे चित्र दिसून येत आहे.

## रेल्वे क्रॉसिंग पुलाचे काम रखडले

। उरण । प्रतिनिधी ।

नवीमुंबई शहर व नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणाऱ्या गव्हाण फाट्या जवळील रेल्वे क्रॉसिंग पुलाचे काम हे अतिशय संथगतीने सुरू असून गेल्या दोन वर्षापासून हे काम रखडले आहे. या पुलामुळे वाहतूकीचा गुंता दिवसेंदिवस वाढत असून रेल्वे प्रशासन व संबंधित प्रशासन यांच्या दुर्लक्षित पणामुळे, अवजड वाहनांच्या वदर्ळीमुळे वळसा घालून ये-जा करणाऱ्या प्रवासी नागरीकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. तरी रेल्वे प्रशासनाने या रेल्वे क्रॉसिंग पुलाच्या कामाला गती देण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## सुकापुर येथील वाईन शॉपला आग



। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

सुकापुर येथील सागर पॅलेस स्टॉक अप वाईन शॉपला बुधवारी (दि.५) सकाळच्या सुमारास मोठी आग लागल्याची घटना घडली. या आगीची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेच्या नवीन पनवेल अग्निशमन केंद्रातून दोन अग्निशमन वाहने आणि पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठे नुकसान टळले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे दुकानातील फ्रिजला आग लागली आणि उष्णतेमुळे वाईनच्या काही बाटल्या फुटल्याने आग अधिक पसरली. अग्निशमन दलाने तत्परतेने ए.बी.सी. एक्सटिंग्विशरचा वापर करून तसेच मुख्य विजेचा पुरवठा बंद करून होजरीलच्या साहाय्याने आग पूर्णतः विझवली. घटनास्थळी उपस्थित दुकान मालक अनिस सगर आणि शिनु पंडित यांनी तत्काळ सहकार्य केले. दरम्यान, उप अग्निशमन अधिकारी संदीप पाटील यांनी घटनास्थळी पाहणी केली. ही आग विझवण्याच्या मोहिमेत प्रमुख अग्निषामक विमोचक मंदार म्हात्रे तसेच अतुल तुपकरी, संदेष ठाकूर, श्रीकांत आढाऊ, आकाश दीक्षित, प्रतीक गाडगे, भावेष महाळुंगे, निमेश पावशे, सोनल गेंगजे, अमोल जाधव, अविनाश भालेराव आदी अग्निशमन कर्मचारी कार्यरत होते.

## गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर



। कोलाड । प्रतिनिधी ।

सातवा महिना उजाडला तरी परतीचा पाऊस बंद होण्याचे नाव घेत नसल्याने उभी असणारी भात पिके आडवी झाली असुन पिकांना मोड आले आहेत. त्यामुळे बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याची शक्यता निर्माण झाली असुन बळीराजा पूर्णपणे संकटात सापडला आहे. या भिजलेल्या भातामुळे पेंढाही वाया जाणार असल्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील ऐरणीवर आला आहे.

हवामानाच्या दिलेल्या अंदाजानुसार येत्या १० नोव्हेंबरपर्यंत पाऊस पडणार आहे. त्यामुळे भात कापणीला विलंब होत असून उभी असणारी भात पिके आडवी पडून कुजून जात आहेत. त्यामुळे सोन्यासारखे आलेले पीक मातीमोल झाले असुन शेतकरी वर्गाच्या डोळ्यात पाणी आले आहे. संपूर्ण रायगड जिल्ह्यासह रोहा तालुक्यातील सातवा महिना उजाडला तरी पाऊस सुरु असल्यामुळे शेतकरी वर्ग पाऊस बंद होण्याची वाट पाहत आहेत. परंतु, अजुनही ८० टक्के भात कापणी बाकी आहे. ही भात पिके पूर्णपणे आडवी झाली आहेत. त्यामुळे शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून लवकरच लवकर पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

## स्मशानभूमीवर अतिक्रमण

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

म्हसळा शहराच्या झपाट्याने होत असलेल्या विस्तारामुळे शहरातील जमिनींची मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर म्हसळा बौद्धवाडीतील स्मशानभूमीवर अतिक्रमणाचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. येथील जागेत होत असलेल्या अतिक्रमणाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत म्हसळे बौद्धजन नवतरुण मंडळ, आदर्श बौद्धजन विकास मंडळ व माता रमाई महिला मंडळ म्हसळा यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.७) सकाळी ११ वाजता नगरपंचायत म्हसळा कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचे मुंबई अध्यक्ष संतोष चापडेकर यांनी माहिती देताना सांगितले.

### पर्यटकांसाठी शुभ वार्ता | दररोज दोन प्रवासी गाड्या

# माथेरानची राणी आजपासून धावणार



। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरानची राणी आणि पर्यटकांच्या लाडक्या मिनीट्रेनची नेरळ-माथेरान-नेरळ प्रवासी सेवा आजपासून सुरू होत आहे. तब्बल २० दिवस उशिरा मिनीट्रेनची प्रवासी सेवा सुरू होत असली तरी माथेरान येथील पर्यटन व्यवसायासाठी हे सुचिन्ह समजले जात आहे. दरम्यान, या मार्गावर दोनच प्रवासी फेऱ्या होणार असल्याने प्रवासी फेऱ्यांमध्ये वाढ करण्याची मागणी अद्याप पूर्ण झालेली नाही.

नेरळ जंक्शन येथून माथेरानसाठी ही मिनीट्रेन सोडली जाते. पावसाळ्यात दरडी कोसळून अपघात होण्याची शक्यता असल्याने दरवर्शी १५ जून ते १५ ऑक्टोबर या कालावधीत नेरळ-माथेरान मार्गावरील प्रवासी वाहतूक बंद ठेवली जाते. यंदा मे महिन्यातच पावसाने मुसळधार सुरूवात केली. त्यामुळे १५ जून रोजी पावसाळा अपेक्षित धरून बंद होणारी मिनीट्रेन यंदा २६ मे रोजी बंद करण्यात आली. त्यानंतर मौसमी पाऊस लांबला आणि निश्चित वेळी म्हणजेच १५ ऑक्टोबर रोजी पुन्हा सुरू होणारी मिनीट्रेन आपला प्रवास सुरू करू शकली नव्हती. अजूनही पाऊस सुरू असताना पर्यटक व प्रवासी वर्गाची प्रचंड मागणी असल्याने या मिनीट्रेनच्या मार्गावर मालवाहू गाड्यांची चाचणी घेण्यात आली. त्या चाचणीत २८ ऑक्टोबर रोजी नेरळ येथून निघालेली मालवाहू गाडी कोणत्याही अडथळा विना पोहचली होती. त्यानंतर पुन्हा मालवाहू गाडी रविवारी (दि.२) पाठवण्यात आली. त्या मालवाहू गाडीचा प्रवास सुखरूप झाल्यानंतर नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनचा प्रवास सुरू करण्याचा निर्णय मध्य रेल्वे प्रशासनाने मंगळवारी (दि.४) जाहीर केला. त्यात गुरूवार दि.६ नोव्हेंबरपासून या मार्गावर दररोज दोन फेऱ्या होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे तब्बल २० दिवस उशिरा नेरळ-माथेरान मिनीट्रेन सुरू होणार आहे. त्यात नेरळ येथून सकाळी मालवाहू गाडी सोडली जाणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता पहिली, तर साडेदहा वाजता दुसरी प्रवासी गाडी नेरळ येथून माथेरानसाठी सोडली जाणार आहे. तर, माथेरान येथून नेरळसाठी पहिली गाडी दुवारी पावणे दोन वाजता आणि दुसरी गाडी ४ वाजता नेरळसाठी रवाना होणार आहे. त्या दोन्ही फेऱ्यांचा कार्यक्रम मध्य रेल्वेकडून जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे नवीन गाड्या वाढवून देण्याची अनेक वर्शाची मागणी आताही प्रलंबित आहे. मात्र, माथेरान ते अमन लॉज या दरम्यान शटल सेवा पूर्वीसारखी सुरू राहणार आहे.

- अद्याप फेऱ्यांमध्ये वाढ नाही

**नेरळ येथून माथेरानसाठी**
सकाळी ०८.५०
सकाळी १०.२५
**माथेरान येथे पोहचणार**
सकाळी ११.३०
दुपारी ०१.०५

**माथेरान येथून नेरळसाठी**
दुपारी ०२.४५
दुपारी ०४.००
**नेरळ येथे पोहचणार**
सायंकाळी.०५.३०
सायंकाळी ०६.४०

**माथेरान-अमन लॉज शटल सेवा**
दररोज सहा फेऱ्या
शनिवार-रविवार आठ फेऱ्या

# युध्द आमुचे सुरु

राज्यातील प्रमुख विरोधी पक्षांच्या मताला न जुमानता राज्य आयोगाने नगरपरिषदा व पंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. इतकी वर्षे या निवडणुका रेंगाळल्या होत्या. निवडून आलेल्या नगरसेवक किंवा नगराध्यक्षांच्या ऐवजी प्रशासक म्हणजे सरकारी अधिकारी कारभार पाहत होते. त्यामुळे इथे जनतेचे खरे प्रतिनिधी निवडून यावेत अशी सर्वांचीच इच्छा आहे. इतकी वर्षे तीच मागणी होती. पण इतर मागासांच्या आरक्षणाच्या खटल्यामुळे निवडणुका स्थगित होत्या. आता त्या घेत असताना सरकारने डाव साधला आहे. मतदारयादीमध्ये ठिकठिकाणी प्रचंड भानगडी आहेत हे विरोधकांनी दाखवून दिले आहे. फार काय, भाजप व शिंदे गटानेही दुबार मतदार असल्याचे पुरावे दिले आहेत. असे असताना याबाबत निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी किमान सर्व नेत्यांची एक बैठक तरी घ्यायला हवी होती. यादी निर्दोष करण्यासाठी आयोग काय करेल हे त्यांना विश्वासात घेऊन सांगायला हवे होते. शेवटी हा या पक्षांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे त्यांच्याकडून सूचना मागवायला हव्या होत्या. तसे काही न करता खास प्रशासकीय हडेलहप्पी करून परस्पर मतदान व मोजणीच्या तारखांची घोषणा झाली आहे. हे सर्व महायुतीच्या सोईने चालले आहे. दुबार मतदारांच्या संदर्भात इतका गदारोळ चालू असताना आयोगाचा त्याच्याबाबतचा तोडगा अगदीच हास्यास्पद आहे. आयोग अशी नावे शोधून त्यांच्या नावापुढे चांदणीचे चिन्ह किंवा स्टार करणार आहे. अशा चिन्हांकित मतदारांना मतदान करताना एकाच ठिकाणी मतदान करीत असल्याचे हमीपत्र द्यावे लागेल. मात्र हे सर्व इतके सोपे नाही. रायगडमध्ये समजा एखाद्याचे नाव अलिबाग व मुरुड अशा दोन ठिकाणी आहे व त्याने अलिबागमध्ये मतदान करायचे ठरवले तर तसे प्रतिज्ञापत्र तो देईल. पण यामुळे मुरुडमधले त्याचे नाव तात्काळ कसे रद्द होणार व त्या नावावर बनावट मतदान कसे रोखले जाणार हे स्पष्ट नाही. दुसरे म्हणजे अलिबाग व मुंबई अशा दोन ठिकाणी समजा नावे असतील तर डिसेंबरमध्ये अलिबाग व जानेवारीत मुंबईत मतदान करण्यापासून त्या मतदाराला कसे रोखले जाणार? कारण, अलिबागची यादी आता प्रसिध्द होईल. पण मुंबईची यादी अजून आलेली नसल्याने तो दुबार आहे की नाही याचा पत्ता आयोगाला लागणार नाही व त्याच्या नावापुढे स्टार होण्याचाही प्रश्न येणार नाही.

### बोगस नावे व पत्त्यांचे काय?

शिवाय मूळ प्रश्न केवळ दुबार मतदारांपुरताच नाही. बोगस पत्ते, आईवडिलांची बोगस नावे, बनावट फोटो अशा अनेक त्रुटी या याद्यांमध्ये आहेत. त्यामुळे एकाच्या नावावर दुसऱ्याला मतदान करणे शक्य होणार आहे. असे गैरव्यवहार मोठ्या प्रमाणात होत असावेत हाच तर विरोधकांचा संशय व आरोप आहे. महायुतीला अशाच भानगडींचा फायदा विधानसभेला झाला असे त्यांचे म्हणणे आहे. त्याची दखलच न घेण्याचे आयोगाचे धोरण अत्यंत आक्षेपार्ह आहे. रोहित पवार यांनी काही दिवसांपूर्वी बनावट आधार कार्ड कसे तयार करता येऊ शकते हे दाखवले होते. त्याबद्दल त्यांच्यावर फिर्याद दाखल आहे. काल त्यांनी बनावट मतदार ओळखपत्र कसे केले जाऊ शकते हे दाखवले. बोगस नावे, पत्ते असलेल्या किंवा धूसर फोटोवाल्या मतदारांच्या नावे हे बनावट ओळखपत्रवाले लोक मतदान करतात की काय व यामागे काही कारस्थान आहे का याचा स्पष्ट उलगडा व्हायलाच हवा. वास्तविक आयोगाने युध्दपातळीवर या प्रश्नांचा सामना करायला हवा. पण त्यांनी केवळ प्रशासकीय कर्तव्य केल्याप्रमाणे निवडणुका जाहीर केल्या आहेत. या स्थितीत आता राजकीय पक्षांना डोळ्यात तेल घालून मतदारयाद्यांवर लक्ष ठेवावे लागणार आहे. प्रत्येक वॉर्डामधील मतदार जातीने तपासावे लागणार आहेत. सध्याच्या स्थितीत दुहेरी नावे कळणे जरा कठीण आहे. वर म्हटल्याप्रमाणे अलिबागमध्येच दुबार नाव असेल किंवा अलिबाग आणि पेण किंवा मुरुडमध्ये दुहेरी नाव असेल तर ते कळेल. पण अलिबाग आणि पनवेल किंवा ठाणे असे दुहेरी नाव असेल तर ते आता कळणार नाही. पण निदान बोगस मतदार तरी त्यांना ओळखता येतील व ते मतदान रोखता येईल त्यासाठी राजकीय मंडळींना प्रत्येक वॉर्डात प्रतिनिधी नेमून काटेकोर काम करावे लागेल.

### राजकीय मूडची चाचणी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नगरपरिषदांचा नंबर आधी लागला आहे. त्यानंतर जिल्हा परिषदा व महापालिकांची पाळी येईल. यामुळे येत्या दोन महिन्यात राज्यातील वातावरण ढवळून निघेल. गेल्या वर्षी म्हणजे २०२४ मध्ये लोकसभा व विधानसभांचे निकाल दोन टोकाचे लागले होते. लोकसभेला महाविकास आघाडीला भरभरून यश तर विधानसभेला जबर दणका बसला होता. त्यानंतर वर्षभरात या निवडणुका होणार आहे. पूर्वी महापालिका वगळता इतर निवडणुका राजकीय पक्ष आपल्या नावाने लढत नसत. स्थानिक प्रश्नांवर व स्थानिक आघाड्यांमार्फत त्या लढल्या जात. पण आता अगदी ग्रामपंचायतीच्या निवडणुकाही राजकीय पक्षांच्या चिन्हांवर लढल्या जातात. महापालिका निवडणुकांसाठी तर आता अगदी पंतप्रधानदेखील प्रचाराला येतात. मुंबई पालिकेच्या प्रचाराला मोदी व शाह तर येतीलच, पण गुजरात उत्तर प्रदेश व इतर राज्यांचे मुख्यमंत्रीही येतील. आता नगरपरिषदांच्या निवडणुकांच्या निमित्ताने या सर्वांची रंगीत तालीम होईल. विधानसभेला प्रचंड यश मिळूनही देवेंद्र फडणवीस सरकारचा कारभार अतिसामान्य राहिला आहे. खुद्द सरकारातच बरीच भांडणे आहेत. तिजोरीत खडखडाट असल्याचे रोज सरकारमधले लोकच मान्य करीत आहेत. या स्थितीत जनता या कारभारावर आपली नाराजी व्यक्त करणार का हे पाहायला हवे. स्थानिक त्या त्या ठिकाणचे अनेक प्रश्नही महत्वाचे आहे. रायगड जिल्ह्याचाच विचार केला तर अलिबाग, रोहा, मुरुड, महाड, कर्जत, पेण, खोपोली ही सर्वच शहरे गेल्या पाचेक वर्षात झपाट्याने वाढली आहेत. गाजर गवतासारख्या इमारती वाढू लागल्या आहेत. त्या मानाने पाणी, सांडपाणी व रस्ते यांच्या सोई झालेल्या नाहीत. ते करण्यासाठी पैसे व नियोजन लागते. त्यांचा अभाव आहे. आहे तो गाडा कसाबसा चालू ठेवायचा एवढेच सध्याच्या प्रशासकांचे ध्येय आहे. त्यामुळे या सर्व शहरांना जनतेतून निवडून आलेल्या कारभाऱ्यांची अत्यंत गरज आहे. तेच काही काम करू शकतील. किमान त्यांनी तसे करावे अशी अपेक्षा राहील. महाराष्ट्रभरात एकूण ६८५९ जागांसाठी लढती होणार असून सुमारे एक कोटी मतदार आहेत. त्यामुळे एका अर्थाने महाराष्ट्रातील मतदारांचा मूड काय आहे हे यातून कळेल. मतदानाला महिन्यापेक्षाही कमी कालावधी आता बाकी आहे. राजकीय कार्यकर्त्यांना रात्रीचा दिवस करून प्रत्येक मतदारापर्यंत पोचावे लागणार आहे. या निवडणुकीच्या आधारे पुढच्या जिल्हा परिषद व महापालिका निवडणुकांवर यांच्या निकालांचा नक्कीच परिणाम होणार आहे. त्यामुळे जिंकू किंवा मरू अशा इर्षेने ही लढाई लढावी लागणार आहे.

---

**विचार**

# निर्बंध रशियावर, फटका भारताला

***रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्यास थांबवायला अनेक प्रकारे सांगून आणि शुल्क लादूनही भारत ऐकायला तयार नाही. त्यामुळे आता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अखेरचा घाव घातला आहे. ट्रम्प यांनी रशियाच्या 'रोझनेफ्ट' आणि 'लुकोइल' या दोन सर्वात मोठ्या तेल कंपन्यांवर नवीन निर्बंध लादले आहेत. निर्बंध रशियाच्या कंपन्यांवर असले, तरी फटका भारताला आणि जगालाही बसणार आहे.***



**प्रा. जयसिंग यादव**

रशियन कंपन्यांवर निर्बंध लादण्याच्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या ताज्या निर्णयाकडे युक्रेन युद्ध संपवण्यासाठी रशियावर दबाव आणण्याचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. ट्रम्प प्रशासनाची ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे. ट्रम्प प्रशासनाने रशियावर थेट आर्थिक दबाव आणण्याची ही पहिलीच वेळ आहे. भारत आणि चीन हे रशियन तेलाचे सर्वात मोठे खरेदीदार आहेत. सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या सहा महिन्यांमध्ये भारताच्या तेल आयातीम ध्ये रशियाचा वाटा ३६ टक्के होता. भारत दररोज अंदाजे १.७५ दशलक्ष पिंप कच्च्या तेलाची आयात करत होता. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे भारताच्या अडचणी वाढल्या आहेत. ट्रम्प यांनी रशियाकडून कच्चे तेल खरेदी करतो, म्हणून भारतावर आधीच २५ टक्के अतिरिक्त कर लादले आहेत आणि आता भारताला एकूण ५० टक्के अमेरिकन कर भरावा लागतो. आता रशियाच्या दोन कंपन्यांवर आर्थिक निर्बंध लादल्याम ुळे भारतातील रिलायन्स इंडस्ट्रिज आणि नायरा एनर्जी या दोन मोठ्या कंपन्यांना फटका बसणार आहे. या कंपन्यांनी रशियाकडून कच्चे तेल खरेदी थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेच्या या पावलामुळे भारताकडून रशियाला मिळणारी परकीय चलनाची रसद बंद झाल्यानंतर रशिया युक्रेनविरोधातील युद्ध थांबवेल, असा विश्वास ट्रम्प यांना आहे. गेल्या काही दिवसांपासून भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे बंद करेल, असा दावा ट्रम्प वारंवार करत होते, ते त्यामुळेच. रशियावर थेट निर्बंध लादण्याऐवजी ट्रम्प प्रशासनाने 'किंमत मर्यादा' प्रणाली स्वीकारली. म्हणजेच, तेलासाठी कमाल किंमत निश्चित करण्यात आली. त्यामुळे रशियाचा महसूल कमी होईल; परंतु पुरवठा कायम राहील; पण रशियाने 'सावली ताफा' तयार करून हे नियम टाळण्याचा मार्ग शोधला.

जुन्या टँकरच्या ताफ्याच्या मदतीने आणि सम ांतर बँकिंग प्रणालीच्या मदतीने, रशिया अजूनही समुद्रमार्गे दररोज अंदाजे आठ लाख पिंप कच्चे तेल विकतो. युद्धापूर्वीही रशियाची तेवढीच निर्यात होत होती. युद्धापूर्वी युरोप तसेच अन्य देश खरेदीदार होते. युक्रेन युद्धानंतर रशियावरील निर्बंध झुगारून भारत आणि चीन मोठ्या प्रमाणात कच्चे तेल खरेदी करायला लागले. भारताची नायरा एनर्जी (ज्याम ध्ये 'रोझनेफ्ट'चा वाटा आहे) आधीच युरोपीय म हासंघाच्या निर्बंधांना तोंड देत आहे. 'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार भारतातील प्रमुख रिफायनरीजनी म्हटले आहे की रशियन तेल खरेदी करणे आता जवळजवळ अशक्य आहे. आतापर्यंत भारताने असा युक्तिवाद केला होता की किंमत मर्यादेखाली रशियन तेल खरेदी करणे कायदेशीर आहे; परंतु अमेरिकेच्या नवीन निर्बंधांमुळे ती परिस्थिती बदलली आहे. ट्रम्प यांनी दोन कंपन्यांवर निर्बंध लादले असले, तरी अप्रत्यक्षपणे सर्व रशियन तेल कंपन्यांवर ही बंदी आहे. अमेरिकेने भारतीय निर्यातीवर अतिरिक्त २५ टक्के शुल्क लादले आहे. भारतावर रशियन तेलाचा वापर करून 'युद्धाचा हेतू' असल्याचा आरोप केला आहे. हा दंड केवळ 'रोझनेफ्ट' किंवा 'ल्युकोइल'सारख्या मंजूर कंपन्यांकडून खरेदी केलेल्या तेलावरच नाही, तर इतर रशियन कंपन्यांच्या कच्च्या तेलावरही लागू होतो. आता भारतासमोर एक महत्त्वाचा प्रश्न आहे. भारत 'रोझनेफ्ट' आणि 'लुकोइल'कडून तेल खरेदी करणे थांबवतो, तेव्हा २५ टक्के कर रद्द केला जाईल का की रशियाकडून येणारे सर्व तेल सोडून द्यावे लागेल? पहिला पर्याय भारताला अमेरिकेच्या निर्बंधांच्या अधीन करतो, तर दुसरा पर्याय भारताला रशियाकडून तेल आयात करण्यापासून रोखतो.

आपल्या गरजेच्या ८५ टक्के तेल आयात करणाऱ्या देशासाठी हे जवळजवळ अशक्य आहे. तेलाच्या वाढत्या किमती ट्रम्प यांच्यासाठी आव्हान निर्माण करू शकतात, कारण त्यांनी महागाई कमी करण्याचे आश्वासन दिले आहे. भारतीय रिफायनरी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार 'रोजनेफ्ट' आणि 'लुकोइल'वरील अमेरिकेच्या नवीन निर्बंधांमुळे भारतात रशियन तेलाचा प्रवाह जवळजवळ थांबेल. त्यामुळे तीन वर्षांपासून अस्तित्वात असलेला दोन्ही अर्थव्यवस्थांमधील एक महत्त्वाचा दुवा तुटेल. यामुळे रशियाच्या तेल उत्पादनात किती घट होईल किंवा भारताने माघार घेतली तर रशियाला नवीन खरेदीदार सापडतील का हे स्पष्ट नाही. वस्तुत: ट्रम्प यांच्या भारतावरील कारवाईचे हे खरे कारण नसून काही तरी वेगळे कारण आहे, असे रशियन मीडिया सुचवत आहे. अमेरिकेच्या निर्बंधांना तोंड देत असलेले 'रोझनेफ्ट' आणि 'लुकोइल' या रशियाच्या सर्वात मोठ्या तेल उत्पादक कंपन्या आहेत. एकत्रितपणे, त्या देशाच्या जवळजवळ पन्नास टक्के कच्चे तेलाचे उत्पादन करतात. अमेरिकेच्या रशियावरील निर्बंधांपूर्वी भारताने रशियन तेलाची खरेदी खूपच कमी केली; परंतु २०२२ च्या अखेरीस परिस्थिती बदलली. जी ७ देशांनी निर्बंध लादले आणि अनेक देशांनी रशियन तेल खरेदी करणे बंद केले. त्यानंतर भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरू केली. २०२१-२२ मध्ये भारताच्या आघाडीच्या दहा कच्च्या तेल पुरवठादारांमध्ये रशिया, इराक, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, अमेरिका, ब्राझील, कुवेत, मेक्सिको, नायजेरिया आणि ओमान यांचा समावेश होता.

'केप्लर' या कमॉडिटी डेटा फर्मच्या अंदाजानुसार ऑक्टोबर महिन्यात भारताची रशियन तेल आयात सुमारे वीस टक्क्यांनी वाढून १.९ दशलक्ष पिंप प्रतिदिन झाली. कारण युक्रेनियन ड्रोनने रशियन रिफायनरीजवर हल्ला केल्यानंतर रशियाने निर्यात वाढवली आहे. रशियाकडून तेल खरेदी करून भारतातील खासगी रिफायनरीजना फायदा झाला. त्यांनी रशियाकडून स्वस्त कच्चे तेल खरेदी केले आणि नंतर शुध्द पेट्रोल आणि डिझेलमध्ये रूपांतरित करुन आंतरराष्ट्रीय बाजारात जादा किमतीला विकले. या कंपन्यांमध्ये 'रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड' आणि रशियन ऊर्जा गट 'रोझनेफ्ट'ची उपकंपनी 'नायरा' यांचा समावेश आहे. ट्रम्प यांच्या नवीन निर्बंधांनंतर 'रिलायन्स इंडस्ट्रीज'ने सांगितले, की कंपनी या निर्बंधांच्या परिणामांचे मूल्यांकन करत असून भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करेल. कंपनीच्या प्रवक्त्याने सांगितले, की आम्ही या निर्बंधांचा आणि नवीन अटींच्या परिणामांचे मूल्यांकन करत आहोत. आम्ही युरोपमध्ये उत्पादित होणाऱ्या तेलाच्या आयातीशी संबंधित सर्व आवश्यकतांचे पालन करू. या विषयावर भारत सरकारने कोणतेही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली, तर त्याचे पूर्णपणे पालन करू. रिलायन्स नेहमीच भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या ध्येयाच्या बाजूने उभा राहिला आहे. भारत आणि चीनव्यतिरिक्त रशिया तुर्कस्तानला दररोज अंदाजे चार लाख पिंप पाठवते. बेलारूस आणि इतर काही देशांनाही हे तेल जाते. रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांना आता जलद निर्णय घ्यावा लागेल.

रशियन अर्थ मंत्रालयाच्या मते, तेल आणि वायूचे उत्पन्न देशाच्या संघीय बजेटच्या अंदाजे एक चतुर्थांश आहे. निर्यात आणि महसुलात घट झाल्याने रशियाच्या युद्धक्षमतेवर थेट परिणाम होईल. ट्रम्प यांच्या घोषणेनंतर ब्रेंट क्रूड ऑइलची किंमत ३.४० डॉलरने (५.४ टक्के) वाढून ६५.९९ डॉलर प्रति पिंप झाली, तर 'यूएस वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट' (डबल्यूटीआय) क्रूड ऑइलची किंमत ३.२९ डॉलरने (५.६ टक्के) वाढून ६१.७९ डॉलर प्रति पिंप झाली. यावरून बाजार निर्बंधांच्या परिणामाबद्दल चिंतित असल्याचे दिसते. अमेरिकेच्या निर्बंधामुळे पुरवठा विस्कळीत होऊन कच्च्या तेलाच्या किंमती ७० डॉलर प्रति पिंपापेक्षा जास्त वाढू शकतात. बाजार प्रत्यक्ष परिणामाचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करत आहे; परंतु दररोज वीस लाख पिंपापेक्षा जास्त पुरवठा खंडित झाला, तर तो किमतीचा दबाव वाढवेल. अमेरिकेने रशियन कंपन्यांशी व्यवहार करणाऱ्या वित्तीय संस्थांवर दुय्यम निर्बंध लादण्याची धमकी दिली आहे.

याचा अर्थ असा, की रशियन तेल खरेदी करणाऱ्या कोणत्याही कंपनीला हे ठरवावे लागेल की तिला अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश मिळवायचा आहे की रशियन कंपन्यांशी व्यापार करायचा आहे. बहुतेक प्रकरणांमध्ये कंपन्या अमेरिकेची निवड करतात. यामागे डॉलरमध्ये मिळणारा निधी गमावण्याचा आणि पाश्चात्य वित्तीय व्यवस्थेपासून तोडले जाण्याचा धोका मोठा आहे. ट्रम्प यांनी इराणवर निर्बंध लादले, तेव्हा भारताने इराणकडून तेल खरेदी करणे बंद केले. त्यामुळे भारताला इराण आणि अमेरिका यापैकी एक निवडण्यास भाग पाडले गेले. आताही भारताला रशिया व अमेरिका यापैकी एक पर्याय निवडायला भाग पाडले जात आहे.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

---

# आता तरी प्रशासनाला सुबुद्धी येवो..

**संतोष राऊळ**

रायगड जिल्ह्याला खड्डेयुक्त रस्ते आणि जिर्ण झालेल्या पुलांचे जणू ग्रहणच लागल्याचे निदर्शनास येत आहे. नुकताच अलिबाग-रोहा मार्गावरील वढाव-खानाव दरम्यानचा पुल कोसळला. त्यात एक दुकाचीस्वार जखमी झाला. सुदैवाने त्या पुलाखालील जमीन जास्त खोलवर नसल्याने तो पुल इंग्रजी व्ही आकारात अडकून राहिल्याने जीवितहानी टळली आहे. नाहीतर महाड मधील सावित्री नदीवरील पुलाची पुनरावृत्ती घडली असती. पावसाळ्यापुर्वी अलिबाग तालुक्यातील सर्व जीर्ण पुलांचे ऑडीट करून त्या ठिकाणाहून जड वाहतूकींना बंदी करण्यात आली होती. असे असतानाही उद्याप जड वाहनांची वाहतूक या पुलावरून सुरूच आहे. विशेष म्हणजे नुकताच पडलेला वढाव-खानाव दरम्यानच्या पुलाचा या ऑडीटमध्ये समावेश नव्हता. त्यामुळे स्थानिकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पावसाळा सुरू झाला की जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात चर्चा असते ती येथील रस्त्यांची आणि पुलांची. दरवर्षी नव्याने त्याच त्याच जीर्ण पुलांचे ऑडीट केले जाते. त्या ठिकाणी अवजड वाहतूक न करण्याचे फलक लावले जातात. परंतु, त्या फलकाला अवजड वाहनचालकांकडून केराची टोपली दाखवली जाते. त्या ठिकाणी फलक लावले की काम संपले, असे समजून सबंधित प्रशासन निद्रावस्थेत जाते. आणि एखादा भीशण अपघात घडल्यास त्यांना खडबडून जाग येते, अशी चर्चा स्थानिकांमधून जोर धरत आहे.

जिल्ह्यासह अलिबाग तालुक्यात असे अनेक पुल आहेत जे जिर्णावस्थेत आहेत. ते कधीही कोलमडून पडू शकतात. त्याची प्रचिती नुकतीच आली आहे. त्यातच अलिबाग-सहाण बायपासमार्गे रेवदंडा या मार्गावरील पाल्हे पुलाची देखील प्रचंड प्रमाणात दुरवस्था झाली आहे. तो कधीही कोसळण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, त्या पुलाची किरकोळ दुरूस्ती करण्यात आली असून ते काम पुर्णत्वास गेलेले नाही. तरीदेखील अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदर बेली जवळील पूल जीर्ण झाल्यामुळे कागदोपत्री बंद ठेवण्यात आला असल्याने मोठ्या प्रमाणात जड वाहतूक याच पाल्हे पुलावरून होत आहे. आता पाल्हे पुलावरून देखील जड वाहतूक बंद करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. परंतु, नवेदर बेली पुलाप्रमाणेच पाल्हे पुलावरील जड वाहतूक फक्त कादगदोपत्रीच बंद राहिली तर मडाड मधील सावित्री पूल दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याची भीती स्थानिकांसह प्रवासी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

पाऊस उद्यापही बरसत असून भरतीच्यावेळी येथील खाडीत मोठ्याप्रमाणात समुद्राचे पाणी शिरते. अशावेळी जर पाल्हे पुल किंवा नवेदर बेली जवळील पुल कोसळला तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तसेच, या मार्गावरून नागावसह मुरूड व श्रीवर्धनकडे पर्यटक पर्यटनासाठी जात असतात. जर न चुकून दुर्घटना घडलीच तर पर्यटकांमध्ये देखील भीतीचे वातावरण पसरेल. त्यामुळे पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या व्यवसायांवर देखील परिणाम होईल. त्यामुळे संबंधित प्रशासन व अधिकाऱ्यांनी वेळेतच जागे होण्याची गरज असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. न चुकून या मार्गावरील पुल कोसळला तर संबंधित अधिकाऱ्यांचे काही एक जाणार नाही. जाईल ते त्यावेळी तेथून प्रवास करणाऱ्याच्या कुटुंबियांचे जाईल. अधिकारी वर्ग दुर्घटना घडल्यानंतर कितत्तरी वेळ उलटल्यानंतर त्या ठिकाणी हजर होईल. ते नुकत्याच पडलेल्या पुलाच्यावेळी निदर्शनास आलेच. त्याचबरोबर पाल्हे पुल किंवा नवेदर बेली जवळील पुल यापैकी कोणताही एक पुल जरी पडला तर त्याचा १०० टक्के भार दुसऱ्या पुलावर येईल. त्यामुळे दुसरा पुलही कोसळेल. या दोन्ही मार्गांना पर्यायी मार्ग नाहीय. आहे तो खुप दुरवरून वळसा घालून आहे. त्यामुळे स्थानिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागणार आहे. संबंधित अधिकारी आणि लोक प्रतिनिधी यांना कितीही लांबून वळसा घालून जाण्याची वेळ आली तरी सरकार त्यांना पोसत असल्याकारणाने त्यांना काहीच फरक पडणार नाही. आमचे हातावर पोट असल्याने आम्ही पैसा पोटासाठी खर्च करायचा कि प्रवासात घालवायचा, असा प्रश्न पडत असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

दरवर्षी जीर्ण पूल दुरूस्त करून शासनाचा पैसा व्यर्थ घालवला जात आहे. त्यात मात्र संबंधित अधिकारी वर्ग आणि लोकप्रतिनिधी आपली पोळी भाजत असल्याच्या चर्चा सुरू आहेत. असेच जर चालू राहिले तर एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास भाजलेली पोळी कर्पवून टाकू, असा इशारा देखील स्थानिकांसह प्रवासी वर्गातून दिला जात आहे. सध्या मुरूड तालुक्यात विकासकामांच्या नावे आचारसंहिता लागण्याआधी मोठी नारळफोडी स्पर्धा संपन्न झाली. परंतु, तेच नारळ अलिबाग तालुक्यातील रस्ते आणि जीर्ण पुलांवर उतरवून तिकडे फोडण्यात आल्याच्या चर्चा जोर धरत आहेत. वढाव-खानाव पुल पडल्यावर तरी संबंधित प्रषासन आणि लोकप्रतिनिधींना जाग येईल, अषी आषा स्थानिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे. कारण याआधी देखील कित्येक वेळा निवेदने आणि आंदोलने करण्यात आली, तरीदेखील त्यांना जाग आली नव्हती. आतातरी संबंधित प्रषासनाला सुदबुद्धी येवो, अषी प्रार्थना स्थानिकांसह प्रवासी वर्गातून होत आहे.

---

**लोकसंसद**

## लग्न समारंभातील अनावश्यक खर्च टाळण्याची नितांत गरज



लग्न म्हणजे दोन जीवांची जन्मभर आनंदाने राहण्याची प्रतिज्ञा. काही दशकांपूर्वी लग्न साधेपणाने होत असत. त्यात वायफळ खर्च होत नसे. पण अलिकडे मोठं मोठी लान्स, तसेच मोठया प्रमाणात आतषबाजी, यांनी परिसर उजळून निघतो काही सामान्य लोक सुद्धा कर्ज काढून लग्न जोरात करण्याचा प्रयत्न करतात. पण हे खरेच जरुरी आहे का? त्याऐवजी तेच पैसे शिक्षणासाठी किंवा इतर गरजांसाठी वापरता येतील. सी आय ए च्या अंदाजानुसार यंदा १ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर दरम्यान देशभरात अंदाजे ४६ लाख लग्ने होण्याचा अंदाज आहे. त्यात सुमारे ६.५० लाख कोटी रुपयांचा व्यवसाय होईल. मागील वर्षापेक्षा लग्ने कमी असतील पण व्यवसाय मात्र मोठ्या प्रमाणात होईल. कॅटचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रवीण खंडेलवाल यांच्या मतानुसार लग्न संख्या गेल्या वर्षीपेक्षा कमी राहील तरी प्रत्येक लग्नाचा खर्च लक्षणीय रित्या वाढला आहे. यंदा कपड्यावर १० टक्के, इव्हेन्ट मॅनेजमेंट वर ५% टक्के तर कॅटरिंग वर १०% खर्च अधिक होण्याची शक्यता आहे. या बरोबर देशात सुमारे एक कोटीहून अधिक लोकांना रोजगार मिळेल यामुळे त्याचा फायदा डेकोरेटर्स, कलाकार, वाहतूकदार , यासारख्या लोकांना होणार आहे गेली कित्येक वर्षे लग्न व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. २०२२ साली तो सुमारे ३.७५ लाख कोटी एवढा होता तर आज २०२५ साली तो तब्बल ६.५० लाख कोटी रुपयावर पोहचला आहे. एकूणच लग्नातील खर्च दिवसेंदिवस वाढतच आहे तो कमी करण्याची आवश्यकता आहे.

**– शांताराम वाघ, पुणे**

---

**दिनविशेष**

# कर्तबगार राजस्त्री महाराणी ताराबाई

राजाराम महाराजांच्या निधनानंतर आपल्या कर्तबगारीने मराठा साम्राज्याचा सांभाळ केलेल्या महाराणी ताराबाई यांचा ६ नोव्हेंबर रोजी स्मृतिदिन. महाराणी ताराबाई ह्या छत्रपती राजाराम महाराजांच्या दुसऱ्या पत्नी आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांची कन्या होत्या. छत्रपती ताराराणी भोसले यांचा जन्म १६७५ साली झाला. ताराबाईंचे लग्न छत्रपती राजाराम महाराजांशी १६८३-८४ च्या सुमारास झाले. ९ जून १६९६ रोजी ताराबाईंना शिवाजी हा पुत्र झाला. मार्च १७०३ रोजी छत्रपती राजाराम यांचा सिंहगड किल्ल्यावर मृत्यू झाल्यानंतर राज्यकारभाराची सर्व सूत्रे हाती आल्यावर समोर उभ्या असलेल्या अनेक कठीण प्रसंगांनी खचून न जाता मोगली फौजांना मागे सारण्यासाठी ताराराणीने आक्रमक भूमिका घेतली. मराठेशाहीतील मुत्सद्यांना काळाचे गांभीर्य समजावून देऊन शेवटपर्यंत या सगळ्यांबरोबर एकजुटीने राहून तिने शत्रूला थोपवून धरले. लष्कराचा आत्मविश्वास वाढवला. मोगलांना कर्दनकाळ वाटावेत असे कर्तृत्ववान सरदार त्यांच्यासमोर उभे केले. दिल्लीच्या राजसत्तेवर स्वतःचा असा धाक निर्माण केला. सन १७०५ मध्ये मराठी फौजा नर्मदा ओलांडून माळवा प्रांतात शिरल्या आणि मोगल फौजांना त्यांनी खडे चारले. त्या जिंकलेल्या प्रांतांमधून चौथाई आणि सरदेशमुखी वसूल करून स्वराज्याची तिजोरी आर्थिकदृष्ट्या बळकट केली. करवीर राज्याची, कोल्हापूरच्या राजगादीची तिने स्थापना केली. ताराबाई मराठ्यांच्या इतिहासातील ही एक कर्तबगार राजस्त्री होती. शिवाजी आणि संभाजी यांच्यामागे तिने कणखरपणे राज्याची धुरा सांभाळली. संताजी, धनाजी यांना बरोबर घेऊन मोगलांना सळो की पळो करून सोडणारी ही रणरागिणी म्हणजे महाराष्ट्रातल्या कर्तृत्ववान स्त्रियांमधील एक मानाचे पान आहे. घोडेस्वारीमध्ये निपुण असलेल्या ताराबाई जात्याच अत्यंत बुद्धिमान, तडफदार होत्या. त्यांना युद्धकौशल्य आणि राजकारणातल्या उलाढालींचे तंत्र अवगत होते. इ.स. १७०० ते १७०७ या काळात शिवाजी महाराजांच्या या सुनेच्या तडफदार धोरणामुळे आणि मुत्सद्देगिरीमुळे औरंगजेबाला मराठ्यांशी झुंज देत ७ वर्षे दक्षिणेत मुक्काम करावा लागला आणि अखेरीस अपयश घेऊन येथेच देह ठेवावा लागला. या काळात ताराबाई आणि दुसरा शिवाजी (कोल्हापूर) यांचा मुक्काम अधिक तर पन्हाळ्यावरच असे. वास्तविक सन १७०० साली छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्याचे उत्तराधिकार छत्रपती शाहू महाराजांकडे जायला हवे होते, पण शाहूराजे त्यावेळी वयाने खूपच लहान होते आणि नंतरच्या काळात मोगलांच्या कैदेत होते. महाराणी ताराबाईंनी आपला मुलगा शिवाजी ह्याला गादीवर बसवले आणि राम चंद्रपंत अमात्य यांच्या सल्ल्याने मराठा राज्याचा कारभार पाहण्यास सुरुवात केली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर संभाजी राजांचे पुत्र शाहू यांची मोगलांनी सुटका करताना महाराष्ट्रात दुहीचे बीज पेरले. शाहू हेच मराठा राज्याचे उत्तराधिकारी असल्याचे अनेक सरदार, सेनानी यांना वाटू लागले. दोन्ही बाजूंनी छत्रपतीपदाच्या वारसा हक्कावरून संघर्ष सुरू झाला. या काळात ताराबाईंच्या पक्षातले खंडो बल्लाळ, बाळाजी विश्वनाथ, धनाजी जाधव यांसारखे सेनानी आणि मुत्सद्दी शाहूंच्या पक्षात गेले. शाहूराजांनी महाराणी ताराबाई आणि त्यांचा पुत्र शिवाजी दुसरा ह्यांच्याविरुद्ध युद्ध पुकारले. १७०७ साली खेड येथे झालेल्या ह्या युद्धात बाळाजी विश्वनाथ ह्या पेशव्याच्या कुशल नेतृत्वाखाली शाहूराजांची सरशी झाली आणि महाराणी ताराबाईंनी साताऱ्याहून माघार घेऊन, कोल्हापूर येथे वेगळी गादी स्थापन केली. सन १७१४ साली राजमहालात झालेल्या घडामोडींनंतर शिवाजीला पदच्युत करून राजे संभाजी ह्या राजारामाच्या दुसऱ्या मुलाला छत्रपती म्हणून नेमले. सरतेशेवटी वारणेला झालेल्या दिलजमाईनुसार शाहूराजांनी कोल्हापूरच्या गादीला संमती दिली. मराठी राज्याच्या अडचणीच्या काळात कोणी कर्तबगार पुरुष घरात नसताना आणि औरंगजेबसारखा बलाढ्य शत्रू आपल्याच राज्यात आलेला असताना एका स्त्रीने राज्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळली.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ नोव्हेंबर

१) श्रीम.संध्या अनिल काठे
मु.किहीम, अलिबाग,
६-११-१९५२

२)श्री.रमेश गणपत पाटील
मु.पो.कुरूळ, अलिबाग
६-११-१९५३

## महिलेवर अत्याचार

**ठाणे :** वर्तकनगर येथे घरकाम करणाऱ्या महिलेवर अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. पीडित महिला एका खासगी एजन्सीमध्ये गेल्या ६ महिन्यांपासून केयर टेकर म्हणून काम करते. या एजन्सीने महिलेला वर्तकनगर येथील कोरस टॉवरमध्ये राहणाऱ्या अनिल गर्ग यांच्याकडे घरकाम करण्यासाठी पाठवले. तसेच त्यांच्याकडे २४ तास राहण्याचेदेखील सांगितले. दरम्यान अनिल हा पीडित महिलेशी जबरदस्ती करून शारीरिक, मानसिक त्रास देत होता.

# रस्ते दुरुस्तीच्या कामांना वेग द्या

## • महापालिका आयुक्तांचे निर्देश; कामांमध्ये हयगय करणाऱ्यांवर होणार कारवाई

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नियोजित आणि नीटनेटक्या रस्त्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबईतील वेगवेगळ्या उपनगरांमधील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. कधी नव्हे इतक्या तक्रारी यंदा रस्त्यांच्या निकृष्ट दर्जासंबंधी येऊ लागल्या आहेत. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मागील आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने घेतलेल्या बैठकीतही हा मुद्दा पुढे आला. या बैठकीत रस्त्यांच्या देखभाल, दुरुस्तीच्या कामांना वेग द्या, असे आदेश आयुक्तांनी दिले. या कामांमध्ये हयगय करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याचा इशाराही आयुक्तांनी दिला आहे.



गेल्या वर्षभरात मात्र शहरातील रस्त्यांची अवस्था कधी नव्हे इतकी वाईट बनली आहे. वाशीसारख्या शहरातही अंतर्गत रस्त्यांवर जागोजागी खड्डे पडल्याचे चित्र आहे. नेरुळ, सीबीडीची अवस्था तर दयनीय बनली आहे. ऐरोली, कोपरखैरणे, घणसोली यासारख्या उपनगरांमधील रस्त्यांची अवस्थाही वेगळी नाही. ठाणे-बेलापूर रस्त्याची अवस्थाही वाईट आहे. यासंबंधी शहरातील जुने जाणते रहिवासी, सुजाण नागरिक, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सातत्याने तक्रारी करत आहे. मात्र अभियंता विभाग ढिम्म असल्याचे चित्र आहे. काही विभागांमधील कार्यकारी अभियंता तर रस्ते खराब नाहीतच, असा दावा करण्यातच मग्न आहेत. या पार्श्वभूमीवर या प्रश्नावर महापालिका आयुक्तांना उशीरा का होईना जाग आल्याचे चित्र नुकत्याच विविध विभागांच्या आढावा बैठकीत दिसून आले.

मागील आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्पातील कामांचा आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्तांनी ही बैठक आयोजित केली होती. रस्त्यांच्या दर्जाबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत असल्याचा मुद्दा या बैठकीत मांडण्यात आला. रस्त्यांच्या सुधारणा कामांना वेग द्या, असे आदेश यावेळी आयुक्तांनी दिले. तसेच रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती करणाऱ्या कंत्राटदारांवर जबाबदारी निश्चित करावी, कोणत्याही प्रकारची सबब चालणार नाही, असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले. पावसाची उघडीप मिळेल तशी रस्ता दुरुस्ती कामे प्राधान्याने करावीत, असेही सांगितले.

या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देत रस्ते धुण्यासाठी महापालिकेकडे असलेल्या वाहनांचा अधिक प्रभावी वापर करावा व त्याकरिता मलप्रक्रिया केंद्रातील पुनर्प्रक्रियाकृत शुद्धीकरण केलेले पाणी वापरावे असेही निर्देश देण्यात आले आहेत.

महापालिका आयुक्तांनी रस्त्यांच्या दर्जाविषयी कठोर भूमिका घेतल्याने आता तरी महापालिकेचा अभियंता विभाग कामाला लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## उंबरे-साजगाव येथे दाखले वाटप

**| वावोशी | प्रतिनिधी |**

आधार कार्ड नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांचा अभाव असलेल्या कातकरी समाजातील नागरिकांना शासनाकडून आवश्यक दाखले देण्यात आले. हा महत्त्वपूर्ण उपक्रम ३ नोव्हेंबर रोजी तहसीलदार कार्यालय, खालापूर येथे पार पडला. तहसीलदार अभय चव्हाण यांच्या पुढाकाराने व निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्या उपस्थितीत उंबरे व साजगाव येथील एकूण १७ लाभार्थ्यांना वय व आदिवासी दाखले वाटप करण्यात आले. या कामात आदिवासी संघटनेचे कार्यकर्ते दिलीप डाके यांनी महत्वाची भूमिका बजावली.

या कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक आदिवासी नागरिक उपस्थित होते. या उपक्रमामुळे समाजातील वंचित घटकांना शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा झाला असून नागरिकांनी तहसील प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## विजेच्या मागणीत घट

**मुंबई :** राज्यात सामान्यतः या महिन्यात ऑक्टोबर हिटमुळे विजेच्या मागणीत वाढ होत असते. याचा परिणाम म्हणून सर्व वीज उत्पादन कंपन्यांना क्षमता वाढवावी लागते. तर वितरण संस्थांना ग्राहकांना सातत्यपूर्ण पुरवठा देण्यासाठी दबाव वाढतो. राज्यांमधील काही जिल्ह्यांत वीजटंचाईमुळे भारनियमन करावे लागते. ऑक्टोबर महिन्यात विजेची मागणी २४ हजार मेगावॉटपर्यंत पोहोचत असे. दरम्यान, यावर्षी राज्यातील अनेक भागांत कोसळलेल्या सरींमुळे शेती पंपांचा वापर मर्यादित राहिला. तसेच एसीसह इतर वीजप्रवण उपकरणांचे वापर ही कमी झाले. परिणामी मागणी २० ते २१ हजार मेगावॉटच्या स्थिरावली. अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे तापमान कमी झाल्याने विजेची मागणी घटली.


# फळपीक विमा निकषात सुधारणा करणार

## • कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची ग्वाही

**| मुंबई | प्रतिनिधी |**

द्राक्ष पिकाचे अवकाळी पावसामुळे नुकसान टाळण्यासाठी पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेची व्याप्ती व निकषात बदल करणार, अशी ग्वाही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

मंत्रालयात द्राक्ष बागायतदार संघटनांच्या अडचणी, फळ-पीक विमा योजना, अवकाळी पावसामुळे झालेल्या द्राक्ष पिकांच्या नुकसानीसाठी द्यावयाच्या नुकसान भरपाई संदर्भात आयोजित बैठकीत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. या बैठकीस आमदार रोहित पाटील, आमदार अभिजित पाटील, उपसचिव संतोष कराड, संचालक रफिक नाईकवडी, संचालक वैभव तांबे, अवर सचिव राजेश पाध्ये व विमा कंपन्यांचे प्रतिनिधी आणि विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, हवामानाच्या बदलामुळे द्राक्ष शेतकरी अडचणीत आहेत. या संकटाचा सामना करण्यासाठी द्राक्ष बागायतदार शेतीचेही यामध्ये नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे. या तक्रारी लक्षात घेता पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेची व्याप्ती व निकष वाढविण्याबाबत योग्य ती कार्यवाही विभागाने करावी, अशा सूचना यावेळी करण्यात आल्या. मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, कृषी विभागाने या सर्व मुद्द्यांवर सकारात्मक दृष्टीकोन ठेवला असून द्राक्ष उत्पादकांच्या अडचणींना प्राधान्याने हाताळले जाईल. तसेच त्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत समन्वय साधून ठोस निर्णय घेण्यात येतील, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले.

## गांजा तस्करांना अटक

**| खेड | प्रतिनिधी |**

मुंबके ते कोरेगावदरम्यान गांजा विक्रीसाठी आलेल्या दोन तरुणांना पोलिसांनी सापळा रचून पकडले. राहिद अब्दुल रऊफ जमादार (३५) आणि मुरसलीन बशीर नाडकर (३०, दोघे रा. संगलट मोहल्ला) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. गोपनीय माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. तपासादरम्यान दोघांकडून १६२ ग्रॅम गांजा (२,४२५ रूपये), दोन मोबाईल फोन आणि इतर साहित्य मिळून एकूण २२ हजार ४४५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक विवेक अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# आरोग्य संस्थांमध्ये स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन

## • उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या रुग्णालयांना मिळणार गौरवपत्र

**| मुंबई | प्रतिनिधी |**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत दि.६ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर याकालावधी दरम्यान सर्व रुग्णालये व आरोग्य संस्थांमध्ये स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येणार आहे. या मुख्य उद्देश महानगरपालिकेच्या रूग्णालयात वैद्यकीय उपचारांसाठी येणाऱ्या रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाईकांना आरोग्य सेवांच्या अनुषंगाने अधिक गुणवत्तापूर्ण अनुभव मिळावा, हा आहे. संपूर्ण मोहिमेनंतर सर्व संस्थांचे मूल्यांकन व श्रेणीकरण करण्यात येणार आहे. स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नवकल्पना आणि सार्वजनिक सहभाग या निकषांवर आधारित मूल्यांकनानुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या रुग्णालयांना गौरवपत्र/प्रशस्तिपत्र देण्यात येणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांशी संबंधित विश्वासाला बळकटीकरण मिळावे यादृष्टीने रुग्णालयातील स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि सुंदर वातावरण राखण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. त्या दृष्टीने आयोजित या स्वच्छता पंधरवड्याचा उद्देश हा आरोग्य संस्थांमधील स्वच्छता पातळी उंचावणे, कचरा व्यवस्थापन सुधारणा करणे, संक्रमण नियंत्रणावर भर देणे तसेच कर्मचारी, रुग्ण आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे, हा आहे.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत या कालावधीत रुग्णालय कार्यालय, वसतिगृहे, चौक्या, उपहारगृहे, भांडारकक्ष (स्टोअर), रुग्णालय अंतर्गत पदपथ इत्यादी याठिकाणी संपूर्ण स्वच्छता मोहीम राबविण्यात येईल. त्यासोबतच निर्जंतुकीकरण, कचरा वर्गीकरण, कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्था, शून्य राडारोडा, भंगार यावर लक्ष केंद्रीत करुन कार्यवाही केली जाईल. रुग्णालयातील उपलब्ध यंत्रणा, कर्मचारी यांच्यामार्फत संयुक्त मोहीम राबविण्यात येणार आहे. आरोग्य सेवेतील सुधारणा, कर्मचारी सहभाग आणि रुग्ण संतोष वाढविण्यासाठी ही स्वच्छता मोहीम महत्त्वपूर्ण पाऊल आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचा दर्जा उंचवण्याच्या अनुषंगाने एकत्रितपणे ही मोहीम राबवण्याच्या सूचना अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा यांनी दिल्या आहेत.

## काशीबाई म्हात्रे यांचे निधन

**चिरनेर :** घारापुरी येथील काशीबाई हरिश्चंद्र म्हात्रे (७२) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले.



पुरतत्व विभागाचे सेवानिवृत्त कर्मचारी हरिश्चंद्र म्हात्रे यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्यावर बोरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात पती, दोन मुली, तीन मुलगे, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## राजकीय फलक हटवण्यास सुरुवात

**चिपळूण :** नगरपालिका निवडणुकीसाठी कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने आठ दिवसांपूर्वीच फलक जप्तीची मोहीम राबवली. यात मुदतबाह्य व अनधिकृत फलक हटवण्यात आले.

मात्र त्यानंतरही काही परवानाधारक असलेले फलक शहरात ठिकठिकाणी उभारण्यात आले होते. त्यामध्ये काही राजकीय फलक होते. त्यावर मंगळवारी आचारसंहिता लागू होताच कारवाई करण्यात आली. १२ कर्मचाऱ्यांनी २ वाहनांच्या मदतीने शहरातील बहादूर शेखनाका, मार्कंडी, पाग पॉवरहाऊस, चिंचनाका, बाजारपेठ, बाजारपूल, गोवळकोट, उक्ताड, भेंडीनाका आणि महामार्गावरील राजकीय व अन्य फलकही तातडीने हटवण्यात आले.

या मोहिमेसाठी पालिकेने स्वतंत्र पथक तयार केले असून, आगामी काळात हे पथक कार्यरत राहणार आहे. त्यामुळे राजकीय स्वरूपाचे फलक व अनधिकृत उभारल्यास त्यांच्यावर कडक कारवाई केली जाणार आहे.

# दिवाळी अंकाचे उद्घाटन उत्साहात

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहे शहराची साहित्य नगरी म्हणून ओळख असलेल्या भाटे सार्वजनिक वाचनालय येथे दर्जेदार दिवाळी अंक उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी अध्यक्ष किशोर तावडे, संचालक नितीन प्रधान, हेमंत ओक, दुर्ग अभ्यासक सुखद राणे, ज्येष्ठ मार्गदर्शक गजानन मळेकर आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. सरस्वती मातेला वंदन करून व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.



त्यानंतर महाराष्ट्राचा सांस्कृतिक परंपरा असलेल्या दर्जेदार दिवाळी अंक- २०२५ चे उद्घाटन मोठ्या उत्साही वातावरणामध्ये करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक कलाब, केशव म्हस्के, ब्राह्मण मंडळाचे माजी अध्यक्ष हेमंत ओक, भरत चौधरी, भिडे, स्वप्नील परांजप आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सूत्रसंचालन ग्रंथपाल आरती धारप, यांनी केले, तर आभार उपाध्यक्ष वसंत भट यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी ग्रंथपाल आरती धारप आणि कर्मचारी वृंद सायली धाटावकर, वैष्णवी जोशी, चेतन पिसाट यांनी अथक परिश्रम घेतले.

**सोन्याच्या नथीसह, बक्षिसांची लूट** | **माधुरी तांबे यांचा पुढाकार**

# मोहनवाडीत रंगला होम मिनिस्टर खेळ

**| खोपोली | प्रतिनिधी |**

रोजच्या धावपळीत कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या महिलांना एक दिवस स्वतःच्या आनंदासाठी या उद्देश्याने दि युवा फाऊंडेशनच्या सचिव माधुरी प्रशांत तांबे यांचा पुढाकाराने प्रभगा क्रमांक तीन महिलांसाठी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम तेज फार्म मैदानावर आयोजित केला होता.

मोहनवाडी, प्रकाशनगर, सिध्दार्थनगर, झेनिथ ठाकूरवाडी आणि विहारी येथील महिला मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होत्या. होम मिनिस्टर खेळ पैठणीचा विजेत्या महिलांना सोन्याची नथ, एलडी टिव्ही, वॉशिंग मशीन अशा आकर्षक बक्षिसांची लूट करण्यात आली. तर उपस्थित सर्व महिलांना मायेची साडी भेट देण्यात आली.



यावेळी उपस्थित महिलांनी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमात मनमुराद आनंद लुटला. या खेळात पल्लवी चौधरी हिने प्रथम क्रमांक पटकाविला. तिला पैठणी साडी, सोन्याची नथ, वॉशिंग मशीन बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तर द्वितीय क्रमांकाचा मानकरी किरण नाईक यांना एलडी टीव्ही देण्यात आली. तृतीय क्रमांक किरण कांबळे यांनी पटकाविल्याने त्यांना मिक्सर ग्राइंडर बक्षीस देऊन सन्मानित केले. तसेच, उपस्थित सर्व महिलांनी मायेची साडी भेट म्हणून देण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सम्यक मित्र मंडळ मोहनवाडी आणि सर्व मित्र परिवाराने प्रचंड मेहनत घेतल्याबद्दल आयोजक माधुरी प्रशांत तांबे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

### नागरिकांसाठी मोफत रूग्णवाहिका भेट

माधुरी प्रशांत तांबे यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक तीनमधील नागरिकांसाठी मोफत रूग्णवाहिका भेट दिली असून आमदार सचिनभाऊ अहिर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

> आजच्या धकाधकीच्या जीवनात महिला कुटूंबाची सेवा करीत असतात. यावेळी त्यांच्यावर प्रचंड मानसिक ताण असतो. त्यामुळे एक दिवस स्वतः आनंदाने घालवता यावा यासाठी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मोहनवाडी, प्रकाशनगर, सिध्दार्थनगर, झेनिथ ठाकूरवाडी आणि विहारी येथील महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद लुटल्याचे मानसिक समाधान वाटत आहे.
>
> – माधुरी तांबे, सचिव, दि युवा फाऊंडेशन

## निवडक



### अखेर कंत्राटी शिक्षकांचे वेतन जमा

**पालघर :** पाच महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अखेर पालघर जिल्हा परिषदेमध्ये भाषा विषय शिकवणाऱ्या बाराशे कंत्राटी शिक्षकांना त्यांचे वेतन मिळाले आहे. दिवाळीच्या सुट्टीमुळे हे पगार रखडले होते. आता जिल्ह्यातील सर्व बाराशे शिक्षकांचे पाच महिन्यांचे ९ कोटी ४३ लाख रुपये वेतन त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. त्यामुळे उशिरा का होईना या शिक्षकांना अखेर न्याय मिळाला आहे. पालघर जिल्हा परिषदेत अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने जिल्हा परिषदेने कंत्राटी मानधन तत्त्वावर बाराशे शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या होत्या. यामध्ये काही शिक्षकांना १६ हजार रुपये प्रति महिना तर काहींना २० हजार रुपये प्रति महिना वेतन ठरवण्यात आले होते. एप्रिल ते सप्टेंबर महिन्यापर्यंतचे वेतन न आल्याने शिक्षकांची अवस्था वाईट झाली होती. पाच-सहा महिने वेतन नसल्याने मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घर खर्च चालवायचा कसा, असा प्रश्न त्यांच्यापुढे होता. दिवाळीच्या आधी राज्य सरकारने कोषागार कार्यालयाला एकूण वेतन जमा केले. परंतु, दिवाळीच्या सुट्टीमुळे वेतन होऊ शकले नाही. सुट्टी संपून एक आठवड्यानंतर कोषागार कार्यालयाने वेतन जिल्हा परिषदेच्या वेतन विभागाकडे दिले. जिल्हा परिषदेने तातडीने ही रक्कम आठ पंचायत समित्यांकडे पाठवली आणि तिथून ही रक्कम शिक्षकांच्या खात्यात जमा झाली.

### घरकुल लाभार्थी अनुदानापासून वंचित

**ठाणे :** जव्हार तालुक्यात ११ हजार ४८६ जणांना शासकीय घरकुल योजना मंजूर झाली आहे. घरकुल लाभार्थीना जलद, पारदर्शक व डिजिटल पद्धतीने निधी वितरित करण्यासाठी एसएनए स्पर्श ही प्रणाली वापरण्याच्या सक्त सूचना केंद्र सरकारने दिल्या आहेत. मात्र गेल्या महिनाभरापासून या नव्या पद्धतीत तांत्रिक अडचणी येत असल्याने ६ हजारपेक्षा अधिक लाभार्थी अनुदानापासून वंचित आहेत. तालुक्यातील जवळपास सहा हजारांपेक्षा जास्त लाभार्थ्यांनी पदरमोड व उसनवारी करत घरकुलाचे काम पूर्णत्वाकडे नेले आहे. गेल्या महिन्यात संबंधित अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करत फोटो काढून ते संकेतस्थळावर अपलोडही केले. परंतु, अद्याप स्पर्श प्रणालीद्वारे अनुदान वितरण झाले नाही. नव्या प्रणालीद्वारे महिनाभरात अनुदान जमा होईल, अशी माहिती गट विकास अधिकारी डी. एस. चित्ते यांनी दिली. केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी जलदरीत्या वितरणासाठी एसएनए स्पर्शचा वापर केला जात आहे. घरकुल अनुदानाचे वितरण आता या नव्या प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे. पूर्वी घरकुल लाभार्थीना पीएफएमएसद्वारे अनुदान वितरित केले जात होते. मात्र त्याऐवजी स्पर्श प्रणालीचा वापर करण्याची सूचना शासन स्तरावरून देण्यात आली आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत लाभार्थीना अनुदानाचा हप्ता मिळाला नाही.



### 'रायगड तोफ' दिवाळी अंकाचे प्रकाशन



**उरण :** उरण तालुक्यातून प्रकाशित होणारा 'रायगड तोफ' हा दिवाळी अंक यावर्षीही प्रकाशित झाला. या अंकाचे प्रकाशन नामांकित उद्योजक नितीन पाटील यांच्या हस्ते त्यांच्या कार्यालयात पार पडले. प्रकाशन सोहळ्यावेळी घारापुरीचे उपसरपंच बळीराम ठाकूर, उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम दामोदर कडू, सेवानिवृत्त शिक्षक रा. ऊ. म्हात्रे, मुख्य कार्यवाहक शशिकांत म्हात्रे, रवींद्र म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. गेल्या काही वर्षांपासून रायगड तोफ हा दिवाळी अंक स्थानिक पत्रकारिता, सामाजिक भान आणि सांस्कृतिक लेखन यांचा संगम साधत आला आहे. या अंकातून रायगड जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर भाष्य करण्यात येत असून, स्थानिक लेखक व पत्रकारांना आपला आवाज मांडण्यासाठी एक व्यासपीठ मिळते. प्रकाशनावेळी उद्योगपती नितीन पाटील यांनी सांगितले की, रायगड तोफ हा फक्त दिवाळी अंक नसून, रायगडच्या जनतेचा आवाज आहे. स्थानिक पत्रकार व लेखकांनी असे उपक्रम सुरू ठेवावेत, हीच खरी समाजसेवा आहे.

### पर्यावरणपूरक शहरनिर्मितीकडे वाटचाल



**पनवेल :** पनवेल पर्यावरणपूरक आणि शाश्वत शहरनिर्मितीच्या दिशेने पनवेल महानगरपालिका दृढ पावले टाकत आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून सुरु असलेल्या हरित पनवेल मोहिमेअंतर्गत ओवे गाव फणसवाडी येथे मियावाकी पद्धतीने घनदाट हरित क्षेत्र उभारणीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिकेने यंदाच्या वर्षी सव्वा लाख रोपांची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, या प्रकल्पाद्वारे त्याला गती मिळत आहे. या मियावाकी हरित क्षेत्र प्रकल्पाची स्थळपाहणी मंगळवारी (दि.४) उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. यावेळी त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण विभागप्रमुख मनोज चव्हाण, लिपिक प्रवीण व्हलगळ तसेच कंत्राटदार संस्थेचे प्रतिनिधी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत ओवे गाव राखीव वन क्षेत्रात एकूण ३१ हजार ५०० झाडांची लागवड करण्यात आली आहे. आणखी सुमारे दोन हजार रोपांची लागवड सुरू असून, गुणवत्तेला प्राधान्य देण्याच्या सूचना उपायुक्त खारगे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

### मारहाण करून मोबाईलची चोरी

**चिपळूण :** बहादूरशेख नाका येथे एका चालकाला मारहाण करून पंचवीस हजारांचा मोबाईल हिसकावल्याप्रकरणी येथील पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. चिपळूण पोलीस ठाण्यात या तिघांविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिपळूण पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चालक कृष्णा महादेव राठोड (वय ३३, रा. सिंदगी तांडा, जि. विजापूर) हा बहादूरशेख नाका येथील एका हॉटेलमध्ये त्याच्या मित्रासह बोलत उभा होता. यावेळी संशयित साहिल संतोष साळवी (२२, रा. कोड्ये, चंदनवाडी, ता. चिपळूण), आकाश राजेश पवार (२२, रा. मिरजोळी, बौद्धवाडी, चिपळूण), प्रवीण प्रमोद पवार (२२, रा. मिरजोळी, पवारवाडी, चिपळूण) हे मोटार घेऊन घटनास्थळी आले. तिघांनी कृष्णा राठोड याला हाताच्या थापटाने मारहाण केली तसेच त्याला ठार मारण्याची धमकी दिली. त्याच्याकडे फोन-पेचा पासवर्ड विचारला आणि त्याच्या हातात असलेला मोबाईल घेऊन पळून गेले.

## निवडक




### मनिषा मोरे यांना राष्ट्रीय पुरस्कार

**माणगाव** : माणगाव येथील सुधाकर नारायण शिपुरकर आणि गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमिक शाळेच्या शिक्षिका मुख्याध्यापिका मनिषा मोरे व सहकारी शिक्षिका मनाली शिरसे, सारा दफेदार, श्वेता शिंदे यांना त्यांच्या उल्लेखनीय अशा शैक्षणिक कार्याबद्दल राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सदरचा पुरस्कार वितरण सोहळा वाशी-मुंबई येथील विष्णूदास भावे सभागृहात सोमवार (दि.४) ऑक्टोबर रोजी संपन्न झाला. भारताच्या पहिल्या महिला पोलीस अधिकारी डॉ. किरण बेदी, प्रसिद्ध बॅडमिंटनपटू साईना नेहवाल यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण माणगाव तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. संस्थाचालक, पालक, विद्यार्थी व ग्रामस्थांनी शिक्षिकांचे अभिनंदन केले आहे.




### हेमंत पयेर यांना पीएचडी प्रदान

**म्हसळा** : आंतरराष्ट्रीय स्तरावर वूडबॉल आणि योगा या खेळांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले खेळाडू हेमंत पयेर यांना नुकतीच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे शारीरिक शिक्षण या विषयात पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे.पयेर यांनी आपल्या संशोधनासाठी योग प्रशिक्षणाचा वूडबॉल खेळाडूंच्या कारक क्षमता व कामगिरीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास या महत्त्वपूर्ण विषयाची निवड केली होती. या विषयावर त्यांनी सखोल संशोधन केले. त्यांना या संशोधनासाठी शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालयाचे संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा डॉ. पी. आर. चौधरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी आणि प्र. कुलगुरू डॉ. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते त्यांना पीएचडी. पदवीचे नोटिफिकेशन देण्यात आले. त्यांच्या यशाबद्दल परशुराम मांदाडकर, चंद्रकांत खोत, निलेश मांदाडकर, महादेव पाटील, संतोष पाटील, महादेव नाक्ती यांच्यासह तालुक्यातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



### तरुणांना बेंजो साहित्याचे वाटप

**पाली/वाघोशी** : सुधागड तालुक्यातील वाघोशी ग्रामपंचायत हद्दीमधील दांडाची वाडी या दुर्गम आदिवासी वाडीसाठी पंचायत समिती पालीच्या २० टक्के सेस योजनेअंतर्गत बेंजो साहित्य पुरविण्यात आले.या वितरण कार्यक्रमाचे आयोजन (दि.४) नोव्हेंबर रोजी पंचायत समिती पाली येथे गटविकास अधिकारी लता मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले. सदर साहित्य मिळवून देण्यासाठी उत्तमराव देशमुख, दीपक पवार, विशाल चिले, हेमंत मुजुमदार, विश्वास वाघमारे, अमित गायकवाड, ग्रामसेवक दादासाहेब कोळसकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

### सुचिता जोशी यांना पुरस्कार

**चिरनेर** : उरण तालुक्यातील जासई येथील प्राथमिक शिक्षिका सुचिता गजानन जोशी. यांना सन २०२४-२५ चा रायगड जिल्हा परिषदेचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. उपक्रमशील, उत्तम तंत्रस्नेही शिक्षिका, तज्ज्ञ मार्गदर्शिका, एससीईआरटी.पुणे तसेच डाएट पनवेल येथे विविध प्रकल्पात सहभाग अशा विविध स्तरावर उत्तम कामगिरी केल्याची त्यांची ही पोच पावती आहे. त्यांच्यावर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/ ८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contanct - 9823585321
- "जन्नावार हॉस्पीटल" अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509
- ऑफिस वर्कसाठी मुलगा/मुलगी पाहिजे. वेळ : १० ते ६ वेतन : ५०००/- कॉम्प्युटर नॉलेज व मराठी टायपिंग आवश्यक. धुमाळ हॉस्पिटल जवळ, चेंढरे-अलिबाग. संपर्क : ७२६३८८५७९०
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# श्रीवर्धनमध्ये आंबा उत्पादन घटणार

**■ वाऱ्यामुळे मोहोर येण्याच्या प्रक्रियेस विलंब ■ फळांवर किडी, रोगराई पसरण्याची शक्यता**

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील भातपीक व नाचणी पीकाचे अतोनात नुकसान झाले असतानाच तालुक्यात आता आंबा पीक ही घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अवकाळीने शेतकरी वर्गाच्या डोळ्यात अश्रू तराळत असतानाच आता आंबा बागायतदार ही धास्तावले आहेत.



श्रीवर्धन तालुक्यात नारळ व रोठा सुपारी या बागायती फळझाडे खालोखाल पीक घेतले जाते ते तृणधान्ये पिकातील भात, नाचणी आणि वर्षावलंबी फळझाडे वर्गात मोडणार्या आंब्याचे.कोकणातील डोंगर उताराच्या जमिनी आंबा पिकास योग्य आहेत.तालुक्यात १९१० हेक्टर क्षेत्रात नव्वद टक्के हापूस तर उर्वरित दहा टक्के पायरी व केसर जातीची लागवड बागायतदारांकडून करण्यात आली आहे. दरवर्षी सरासरी सत्तेचाळीस हजार टन आंब्याचे उत्पादन तालुक्यात होते.

आंब्याच्या झाडाला साधारणपणे आक्टोबर अखेर ते नोव्हेंबर या महिन्यात मोहोर येण्याची प्रक्रिया सुरू होते व हि मोहोर येण्याची प्रक्रिया जानेवारी महिना अखेर पर्यंत सुरू रहाते. परंतु, यावर्षी अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण तसेच वादळी वाऱ्यामुळे अद्यापही मोहोर येण्यास सुरुवात झाली नाही. सध्याचे वातावरण बघता मोहोर प्रक्रियेस आणखी काही महिन्यांचा कालावधी जाणार आहे.

फेब्रुवारी अथवा मार्च महिन्यात मोहोर येण्यास सुरुवात झाली तर फळधारणा साधारण तीन महिन्यांनी म्हणजेच जून महिना दरम्यान होईल व याच दिवसात ढगाळ वातावरण आणि पावसाचे दिवस सुरु होत असल्याने फळांवर किडी व रोगराई पसरण्याची शक्यता आहे. खराब आणि लहरी वातावरणामुळे या हंगामात आंबा उत्पादन घटण्याची भिती बागायतदारांनी व्यक्त केली आहे.

> **पाऊस अद्यापही पडत असल्याने थंडी लांबणार आहे. त्यामुळे मोहोराची फुट उशिरा होणार. त्यामुळे येणारे फळधारणा लांबणीवर जाऊन पावसाळी दिवसात फळ येणार आहे. यामुळे आंबा पीक धोक्यात आले आहे.**
>
> **– मंगेश कर्णेकर, आंबा बागायतदार, श्रीवर्धन**

#### पेंढ्याची समस्या

परतीच्या पावसामुळे शेतात पाणी साचले, पीक कुजले असल्यामुळे पेंढा नाही आहे. अवकाळी पावसाने भातपीक संकटात आले आहे. भाताचा पेंढा हा आंबा फळ खोक्यात पॅकिंग करताना वापरला जातो. भाताचे अतोनात नुकसान झाल्याने पॅकिंग करीता पेंढा मिळणे यावर्षी कठीण होणार आहे.

## डेब्रीज टाकणाऱ्या डंपर्सवर कारवाई

| पनवेल | प्रतिनिधी |

सिडकोने संपादित केलेल्या जमिनींवर तसेच संपादिक करण्यात येत असलेल्या भूखंडावर बेकायदा डेब्रिज टाकणाऱ्या डंपर बरोबर त्यांच्या चालकांना रंगेहाथ पकडून या प्रकारांना आळा घालण्यासाठी सिडको प्रशासनाने कंबर कसली आहे. त्याचाच एक भाग म्हणून सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने नुकतीच करंजाडे नोड से-३ करंजाडे येथे सिडकोच्या कार्यक्षेत्रात डेब्रीज खाली करणाऱ्या दोन डंपर्सवर कारवाई करून ते जप्त करण्यासह चालकांविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



मुंबईतील राडा रोडा नवी मुंबई परिसरात दिवसा तसेच रात्रीच्या अंधारात गुपचूपपणे टाकण्याचे प्रकार वाढले आहेत. अशाच प्रकारे राडा रोडा घेऊन एक डंपर करंजाडे नोड से-३ येथे येत असल्याची माहिती सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग,

करंजाडेत डेब्रीज टाकण्यासाठी आलेल्या एमएच-४६- बीयू-७४९४ व डंपर क्रमांक एमएच-४६-बीएम-०३१३ वरील चालक हे त्यांच्या ताब्यातील डंपर मधून मानवी जिवितास व लोकांच्या आरोग्यास धोकादायक असलेले डेब्रीज हे अनधिकृतपणे आणून करंजाडे नोड से-३ याठिकाणी सिडको कार्यक्षेत्रात खाली करत असतांना मिळून आले. यावेळी भरारी पथकाने दोन्ही डंपर जप्त केले असून याबाबत चालक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## स्वच्छता गृहाचे लोकार्पण

| माणगाव | प्रतिनिधी |

श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थान, उद्धर येथे मंगळवार (दि.४) नोव्हेबर रोजी नवीन स्वच्छता गृहाचे लोकार्पण करण्यात आले. या देवस्थानाला दररोज जिल्हाभरातून शेकडो भक्त दशक्रिया विधीसाठी येतात. या पार्श्वभूमीवर उभारण्यात आलेले नवीन स्वच्छता गृह हे भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.



लोकार्पण सोहळ्यास उद्धर गावातील ग्रामस्थ, भक्तगण तसेच पंच समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी परिसरात उत्साहवर्धक आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. उद्धर देवस्थान समितीच्या या उपक्रमामुळे भाविकांना दिलासा मिळत असून, 'स्वच्छ मंदिर, सुंदर परिसर' या संकल्पनेला चालना मिळाली आहे.

## सातीर्जेत अजगराला जीवदान



| सोगाव | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील सातीर्जे येथील तलावात मासे पकडण्यासाठी टाकलेल्या जाळ्यात अडकून तब्बल ७ फूट लांब व अंदाजे १४ किलो वजन असलेल्या अजगराला चोंढी येथील सर्पमित्र आसिफ मलिक यांनी सुरक्षितरित्या पकडून जंगलात सोडून देत जीवनात दिले.

मंगळवार दि.४ नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजताच्या सुमारास सातीर्जे येथील एका तलावात मासे पकडण्यासाठी रात्रीच्या सुमारास जाळे टाकण्यात आले होते. ते जाळे काढण्यासाठी सकाळी गेले असता त्या जाळ्यात भला मोठा अजगर अडकल्याचे निदर्शनास आल्यानंतर मासेमारी करणाऱ्यांनी ताबडतोब चोंढी येथील सर्पमित्र असिफ मलिक यांना संपर्क साधून माहिती दिली. यावर सर्पमित्र मलिक यांनी त्वरित प्रतिसाद देत घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता तो साप हा अजगर असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी आपल्या कलाकौशल्याने अजगराला पकडून कनकेश्वर येथील जंगलात सुरक्षित स्थळी सोडून देत जीवदान दिले. याबद्दल सर्पमित्र आसिफ मलिक यांचे किहीम सरपंच पिंट्या गायकवाड यांनी व त्यांच्या मित्रपरिवारांनी कौतुक केले आहे.

निसर्गाचा समतोल राखण्यासाठी साप हे मुख्य घटक असल्याने चोंढी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी त्या सापांना न मारता मला ७८८७६८४६७८ या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## मोतीबिंदू रुग्णांना मिळाली नवी दृष्टी

| रोहा | प्रतिनिधी |

रोह्यात नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात ८१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी डोळ्यात मोतिबिंदू आढळलेल्या ३९ रुग्णांना नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला, शंकरा आय हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. यासाठी प्रवासाची सोय सुद्धा विनामूल्य करण्यात आली.



रोहा सिटिझन फोरम आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. श्री धावीर मंदीर भक्त निवासात झालेल्या या ४३ व्या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. शंकरा आय हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ. प्रियदर्शिनी, प्रतिक्षा माने, सिद्धी मोरे, रुचिका जंगम, ओमकार पाटील, विश्वनाथ पाटील, ज्ञानेश्वर कांबळे यांनी रुग्णांची तपासणी केली. या शिबिरांच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांत ३५०० हून अधिक नेत्र रुग्णांना नवीन दृष्टी प्राप्त झाल्याने शिबिरात तपासणी साठी येणाऱ्या रुग्णांची संख्या कमालीची वाढली आहे. रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, मिलिंद अष्टिवकर, श्रीकांत ओक, अहमद दर्जी, महेश सरदार, संदीप सरफळे, इलियास डबीर, संतोष खटावकर, दिनेश जाधव, शैलेश रावकर, बिलाल मोर्बेकर, परशूराम चव्हाण, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, राजेश काफरे आदी फोरम च्या सर्व सदस्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## नागोठण्यात लायन्स क्लबतर्फे नेत्र तपासणी



| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठणे शहरातील व्यावसायिक सद्दाम दफेदार, रमीज दफेदार आणि फजल दफेदार यांच्या सहकार्याने नागोठण्याचे माजी सरपंच फरमान दफेदार यांच्या स्मरणार्थ आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल नवीन पनवेल यांच्या सहकार्याने नागोठणे लायन्स क्लबने येथील शांतीनगर भागातील स्व. बाळासाहेब ठाकरे बाल उद्यानात आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात ५२ नागरिकांनी त्यांच्या डोळ्यांची तपासणी केली. यामध्ये मोतिबिंदू आढळलेल्या १७ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे पाठविण्यात येणार आहे.या शिबिरास प्रकाश जैन, सुधाकर जवके, यशवंत चित्रे, विवेक सुभेकर, विशाल शिंदे, विलास चौलकर, अखलाक पानसरे, बाळासाहेब टके, शब्बीर पानसरे, सिराजभाई पानसरे, लायन दौलत मोदी, लायन विनोद सावंत, लायन सुजाता जवके, लायन सुनील कुथे, लायन विवेक करडे, लायन विजय शहासने, लायन दीपक लोणारी, दीपक गायकवाड, आसिफ मुल्ला, सलीम कुरेशी, अलकाश कोरतकर, अशपाक सुमरा आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटलच्या डॉ. सलोनी सुभेकर, ज्योती पाटील, नेहा कदम आदींसह अनेक मान्यवर व परिसरातील नागरिक नेत्र तपासणीसाठी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी केले.

### सापामुळे भीतीचे वातावरण

| पनवेल | प्रतिनिधी |

खांदा वसाहत परिसरात दिवड जातीच्या सापामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सेक्टर-८ मधील साईप्रसाद को-ऑप. सोसायटीच्या फूटपाथवरून जात असताना महिला व नागरिकांनी या सापाला पाहिले. त्यावेळी सापाने नुकतेच खाद्य खाल्ल्यामुळे त्याची हालचाल मंद होती, मात्र काही वेळातच तो ड्रेनेज लाईनमध्ये शिरल्याने लोकांनी निश्वास सोडला. परंतु सायंकाळी तोच साप पुन्हा रस्त्यावर दिसल्याने परिसरात पुन्हा एकदा खळबळ उडाली. तात्काळ सर्पमित्रांना कळविण्यात आले, पण त्याआधीच साप पुन्हा ड्रेनेजमध्ये निघून गेला. पुन्हा सेक्टर-८ मधील दुर्गामाता मंदिराजवळील गवतामध्ये तोच साप दिसल्याने नागरिकांची एकच धावपळ उडाली.

### शेतकरी संघटनेचे मोर्चाचे आयोजन

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुका शेतकरी संघटनेच्या प्रमुख पदाधिकारी व सदस्यांची बैठक मंगळवार (दि.४) नोव्हेंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती माणगाव याठिकाणी संघटनेचे अध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. या मोर्चासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थि राहण्याचे आवाहन करण्यात आले.

या बैठकीला संघटनेचे रामभाऊ टेंबे, सरपंच कदम, अशोक पाटील, सखाराम जाधव, वडेकर गुरुजी, नितीन वाघमारे, सुभाष गुगळे, विश्वंभर दांडेकर, काशीराम पोवार, बाबू पाखुर्डे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व शेतकरी बांधव मोठ्या समख्येने उपस्थित होते

**शेतात वाहते अजून पाणी | जमीन कोरडी होण्यास लागणार वेळ**

# उरणमध्ये कडधान्य लागवड लांबणीवर

| चिरनेर | प्रतिनिधी |

सततच्या पावसामुळे रब्बी हंगामातील लागवड लांबणीवर गेली आहे. ऑक्टोबर महिन्यातील तीव्र उन्हाळ्यामुळे पावसानंतर जमीन कोरडी होऊन रब्बी हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांना पुरेसा वेळ मिळत होता मात्र पाऊस लांबल्याने रायगड जिल्ह्यातील भात पिकांबरोबरच जानेवारीत तयार होणाऱ्या उरण पूर्व भागातील कडधान्य पिकांना बसला आहे. सतत पाऊस सुरू राहिल्याने यंदा जमिनीत ओलावा वाढला आहे.



यामुळे यावर्षी उरण तालुक्यात कडधान्य पिकांची लागवड उशिरा होणार असल्याची माहिती कडधान्य उत्पादक शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, अनिल केणी, दत्तात्रेय म्हात्रे या शेतकऱ्यांनी दिली आहे. तालुक्यातील वाल पिकाला भौगोलिक वातावरण असून, येथील जमीनीत वाल, चवळी, हरभरा, मूग या कडधान्य पिकांना जसा हवा तसा ओलावा टिकवून धरणारी कसदार अशी विशेष गुणधर्म असणारी खांबारी जमीन असल्यामुळे, या विभागात मोठ्या प्रमाणात शेतकरी रब्बी हंगामातील कडधान्य पिके घेत आहेत. पिवळ्या मोठ्या आकाराचे व रुचकर वालाचे पीक येथील शेतकऱ्यांच्या शेत जमिनीत पिकत असल्यामुळे उरण तालुक्यातील पूर्व विभागातील वालांना एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. दरवर्षी स्थानिकांसह पर्यटक देखील तालुक्यातील चिरनेर पूर्व विभागातील वाल, चवळी, मूग हरभऱ्याचे कडधान्य खरेदी करतात. दरम्यान यावर्षी जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडला आहे. भातशेतीला पोषक असे वातावरण मिळाले आहे. परंतु परतीच्या पावसामुळे भात शेतीला मोठ्या प्रमाणावर फटका बसला आहे.त्याची झळ या परिसरातील कडधान्य पिकांना पोहोचली असल्याची चिंता कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

परतीच्या पावसामुळे जमिनीत ओलावा राहिला आहे. ओलाव्यामुळे कडधान्य पिकांची पेरणी करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे कडधान्य पिकांची लागवड यावर्षी उशिरा होण्याची शक्यता वर्तविली जात असतांना, कडधान्य उशिरा बाजारात दाखल झाल्यास त्याचा शेतकऱ्यांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

परतीची अवकाळी पावसामुळे भात शेतीची कामे रखडली असून, ती लांबणीवर जात आहेत. शिवाय शेतात पाण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे हा ओलावा सुकेपर्यंत शेतकऱ्यांना नांगरणी करता येणार नाही. टोचणीचे व फेकणीचे वाल चवळी हरभऱ्याचे धान्य टाकण्यासही शेतकऱ्यांना अडचणी निर्माण झाल्या आहेत.

# करवाढीविरोधात संतप्त पालीकरांचा एल्गार



। सुधागड–पाली । प्रतिनिधी ।

पाली नगरपंचायतने प्रस्तावित केलेल्या करवाढीविरोधात नागरिकांमध्ये तीव्र असंतोष उसळला असून, यासंदर्भात बुधवारी (दि.५) येथील भक्त निवास क्रमांक १ मध्ये आढावा बैठक पार पडली. या बैठकीत संतप्त नागरिकांनी प्रशासनाच्या एकतर्फी निर्णयाचा जोरदार निषेध करत, निवडून दिलेल्या नगरसेवकांना जबाबदारीची जाणीव करून देणारे खरमरीत निवेदन सादर केले.

याबैठकीतपाली–सुधागडसंघर्ष संस्थेचे सदस्य व पालीतील सुजाण नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत सादर करण्यात आलेल्या निवेदनात कारवाढी संदर्भात शास्त्रशुद्ध लेखाजोखा आणि कशाप्रकारे करवाढ शास्त्रशुद्ध व नियोजित पद्धतीने होऊ शकते, तसेच नागरिकांवरील बोजा कमी होऊ शकतो, याबाबत माहिती देण्यात आली. परंतु, याविरोधात नाराजी दर्शविली आहे. दरम्यान, त्यांनी निवेदनात नगरसेवकांना खरमरीत निवेदन देण्यात आले. या निवेदनात ठणकावून नमूद करण्यात आले की, पालीतील नागरिकांनी तुम्हाला निवडून दिले आहे, ही जबाबदारी आहे, सौभाग्य नव्हे. जनतेच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करा, अन्यथा जनतेला उत्तर द्यावे लागेल. तसेच, नागरिकांनी प्रशासनाच्या धोरणांचा निषेध करत पुढील काळात तीव्र आंदोलनाची तयारी दर्शवली आहे. नगरसेवकांनी जनतेच्या भावना समजून घेऊन तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासनाच्या एकतर्फी भूमिकेचा जाहीर निषेध करत, लोकशाही मूल्यांची पायमल्ली थांबवावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

### तीव्र शब्दांत कानउघडणी

करवाढीचा निर्णय जनतेच्या मर्जीत न बसणारा आणि आर्थिकदृष्ट्या अन्यायकारक आहे. नगरपंचायतीने कोणतीही खुली चर्चा न करता घेतलेला हा एकतर्फी आणि अलोकशाही निर्णय आहे. त्यामुळे निवडून दिलेल्या नगरसेवकांनी जनतेच्या बाजूने ठामपणे उभे राहण्याची गरज आहे. त्यांनी जनतेच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करणे ही त्यांची जबाबदारी आहे. केवळ पदाची शोभा मिरवण्याऐवजी जनतेच्या अडचणी समजून घेऊन ठोस उपाययोजना करणे अपेक्षित आहे. अशाप्रकारे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवक आणि लोकप्रतिनिधींची तीव्र शब्दात कानउघडणी करण्यात आली.

## शिक्षक पात्रता परीक्षा वेळापत्रक जाहीर

। पनवेल । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत दि.२३ नोव्हेंबर रोजी शिक्षक पात्रता परिक्षा जिल्ह्यातील ६ केंद्रावर घेण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आयोजन व सनियंत्रण समिती अध्यक्ष किशन जावळे यांच्या मार्गदर्शनानुसार व निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या उपस्थितीत शिक्षक पात्रता परीक्षा बैठक दि.३० ऑक्टोबर रोजी पार पडली. ही परीक्षा कळंबोलीतील सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय माध्यमिक, नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकुर विद्यालय, के.आ. बांठिया माध्यमिक विद्यालय, सेंट जोसेफ माध्यमिक विद्यालय, जुने पनवेल येथील को.ए.सो. के.व्हि. कन्या विद्यालय व ज्युनियर कॉलेज, को.ए.सो. व्हि.के. विद्यालय या सहा केंद्रांवर घेण्यात येणार असून, परीक्षा दि.२३ नोव्हेंबर रोजी सकाळ सत्र पेपर १ – सकाही साडेदहा ते दुपारी १ वाजेपर्यंत तर दुपार सत्र पेपर २– दुपारी अडीच ते संध्याकाळी पाचवाजेपर्यंत होणार आहेत.

## गड किल्ले स्पर्धेचे आयोजन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात अत्रांट वरेडी या गावामध्ये बालकलाकार यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी गड किल्ले बनविण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांच्या माहितीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी हि स्पर्धा भरवण्यात आली होती.

कर्जत तालुक्यातील अत्रांट वरेडी येथे दिवाळी चे सुट्टीसाठी गड किल्ला स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये गावातील आणि परिसरातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शवला होता. या गडकिल्लूयांचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचावे यासाठी या स्पर्धेचे आयोजन रायगड जिल्हा परिषद शाळा अंत्राट (वरेडी) येथे करण्यात आले होते. याच कार्यक्रमानिमित्त शिव व्याख्यान व्याख्याते अक्षय श्रीखंडे यांनी दिले. त्यांनी शाळेतील विद्यार्थी व तरुणांना छत्रपती शिवरायांबद्दल माहिती दिली. यावेळी गड किल्ले बनवण्याच्या स्पर्धेत ५० हुन अधिक बालकलाकार यांनी आपला सहभाग नोंदवला होता. त्या सर्व बालकलाकार यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट देण्यात आली.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री. आत्माराम द्वारकानाथ गायकवाड रा. घर नं. ४१७, ओवले पनवेल, रायगड-४१०२०६ यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

| जमीन मालक | सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १.शहजाद शब्बीर लोगडे<br>२.शहबाद शब्बीर लोगडे | ८८/१ | ०.१९.२०<br>पोखराबा ०.००.३०<br>एकुण क्षेत्र ०.१९.५० | ०.३० |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा- कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख :- ०६/११/२०२५

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को. ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

### महाराष्ट्र शासन
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, पहला मजला, महषी कर्वे रोड, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१**
Email ID :arcsalibag@gmail.com

जा.क्र.५७७ सनिअ/वि.१/का.क.१०१/कमळ पत/सुनावणी नोटीस २०२५ दिनांक :- ०४/११/२०२५

**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग जि. रायगड यांचे समोर**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये जाहीर नोटीस.**

ज्या अर्थी कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग यांनी दिनांक २४/०९/२०२५ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणसमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ व च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक २६/०९/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. प्रतिवादी यांची नोटीस Address Left असा शेरा मारुन टपालाने परत आली. तसेच जाब देणार प्रतिवादी कर्जदार व जामिनदार यांना नोटीस पोहोच होऊन देखील सुनावणीस हजर राहिले नाहीत व ज्यांना अद्याप पर्यंतही नोटीसा मिळालेल्या नाहीत अशा कर्जदार व जामिनदार यांना सदर कलम अन्वये व नियमाखाली सदर जाहीर नोटीसद्वारे आपले म्हणणे दाखल करण्यासाठी संधी देण्यात येत आहे. तसेच अर्जदाराने जाहीर नोटिस देणेची विनंती केली आहे.

त्याअर्थी खालील यादीतील कर्जदार व जामिनदार यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक २०/११/२०२५ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वाजता सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, काँग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, पहीला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १५ दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे. या कामी तुम्ही गैरहजर राहीलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/ शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करुन अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

| अ. क्र | कर्जदाराचे नाव | अर्ज दाखल दि. | दावा क्रमांक | दावा रक्कम | जमीनदार क्र. १ | जमीनदार क्र.२ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. जब्बारसिंग जामतसिंग राठोड | २४/०९/२०२५ | १४१/२०२५ | १,०३,१७६.५० | विक्रमसिंग जामतसिंग राठोड | सौ.कैलासकुंवर जब्बारसिंग राठोड |
| २. | श्री.गिरीधर नथु भदाणे | २४/०९/२०२५ | १४३/२०२५ | २८,३५,५३७.५० | श्री.अल्पेश अरविंद पाटील | श्री.भावेश भालचंद्र पांचाळ |
| ३ | श्री. हेमंत नथु भदाणे | २४/०९/२०२५ | १४४/२०२५ | ११.८०.२२६.५० | श्री.गिरीधर नथु भदाणे | श्री.अल्पेश अरविंद पाटील |
| ४. | श्रीमती.पुजा विमल जैन | २४/०९/२०२५ | १४५/२०२५ | ५२.११२.०० | संदिप महादेव रसाळ | - |
| ५. | श्री.नरपतसिंह कालुसिंह राठोड | २४/०९/२०२५ | १४६/२०२५ | ९१,२६०.५० | श्री.जब्बारसिंग जामतसिंग राठोड | सौ.कैलासकुंवर जब्बारसिंग राठोड |
| ६. | श्री.विक्रमसिंग जामतसिंग राठोड | २४/०९/२०२५ | १४७/२०२५ | ९१,०६१.५० | श्री.नरपतसिंह कालुसिंह राठोड | श्री.जब्बारसिंग जामतसिंग राठोड |
| ७. | सौ.नेहा नितीन तुणतुणे | २४/०९/२०२५ | १४८/२०२५ | ७४,८११.०० | श्री.विशाल नारायण पोईलकर | श्री.शैलेश गोपाळ उदेक |
| ८. | सौ.मोहिनी मनोज साळवी | २४/०९/२०२५ | १४९/२०२५ | ५१,०१६.०० | श्री.मनोज नंदकुमार साळवी | --- |

स्थळ - अलिबाग

सही/-
**(अविनाश इंगळे)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १)श्रीनिवास सदाशिव गद्रे व २)नीता राजेंद्र खानोलकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे | ५६८ | ०-४६-६०<br>०-०३-००<br>**०-४९-६०**<br>पो. ख. ०-०१-३०<br>पो. ख. ०-०५-६०<br>**०-५६-५०** | १२.१९ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ६/११/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मारुती गणपत पडवळ, रा. मुंबई यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे हरनेरी, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| १२ | १ | ०-३४-६० | ३.३७ |
| १२ | ५ | ०-५५-८० | ४.६४ |
| १२ | ६ | ०-०६-६० | ०.३४ |
| १६ | ४ | ०-३४-०० | ०.०९ |
| १६ | ६ | ०-५३-१० | ०.१६ |
| १६ | ७ | ०-१०-६० | ०.०३ |
| १६ | १८ | ०-५१-१० | ०.२७ |
| १६ | १९ | ०-३६-९० | ०.१९ |
| १६ | २१ | ०-३०-०० | ०.१४ |
| १६ | २२ | ०-०५-६० | ०.०२ |
| १७ | १ | ०-१३-१० | ०.३६ |
| १८ | १३ | ०-८१-०० | ०.५० |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतींचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ५/११/२०२५

सही /-
**नितीन मोरेश्वर शेवाळे**
ॲडव्होकेट
संतकृपा, मु. पो. पाली
ता.सुधागड, जि.रायगड पिन ४१०२०५
मोबा नं. ९०२८७२३८७३

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली शेतजमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- दामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./हिस्सा नं | क्षेत्र : हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| १. पांडुरंग भाऊ तरे,<br>२. शारदा रघूनाथ घरत,<br>३. कृष्णा भाऊ तरे, | ६०/१/ब | ०-२१-७०३.६२<br>सातबारा प्रमाणे प्रत्येकी हिस्सा | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता सदनिका कं. १०८,
पहिला मजला, विंग बी. लक्ष्मी अपार्टमेंट
बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण : कर्जत

सही/-
**ॲड. सुर्यकांत भाऊ मसणे**
दिनांक : ०६/११/२०२५
मो.नं. ९९२२१५५१५३

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतिचे विद्यमान मालक १) प्रदिप चिंतु इंद्रे आणि २) दीपक चिंतु इंद्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/ किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-परहुर, तालुका - अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १२, एकूण क्षेत्र ००-३२-३० ( हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ८.३७/- धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्धः

उत्तरेस आणि त्या दिशेने : परहुरपाडा गावाची सीमा
दक्षिणेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १ आणि ११
पूर्वेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १
पश्चिमेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ११

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०६/११/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे नागलोली, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील गट नं. ३४०, एकूण क्षेत्र ०२-१७-०० हे.आर.चौ.मी. आकार ४.८७/-, पैकी क्षेत्र ०-६३-०० हे.आर.चौ.मी., पो. ख. ०-३७-००, आकार-०.३३ या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम. तुलीका नरेश भंडारी, रा. सत्यम खरा नं. ४०१/४०२, नेमिनाथ अपार्टमेंट, रामानगर, अहमदाबाद शहर, गुजरात, ३८०००५. तसेच एकुण क्षेत्रा पैकी क्षेत्र ०-९४-०० हे.आर.चौ.मी., आकार ०.४९ या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अक्षय शांतीलाल जैन, रा. मु. पो. ता. श्रीवर्धन, जि. रायगड ४०२ ११०. ह्या दोन्ही विद्यमान मालक यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची बोलणी केली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यत ताबे कब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकीखाली आहे. सदर जमिन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधीत सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी मिळवून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यानी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दि. ०६/११/२०२५
कार्यालयीन पत्ता,
रा. कसबा पेठ, श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड

सही/-
**ॲड. गोदावरी सुरेश करडे.**
B.Sc. LL.M
खरेदीदाराचे वकील
९३७०२६८५५८/८६९८०००२३८

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३८८/२०२५

**जाहीरनामा**

अर्जदार श्री. कुतुबुद्दीन फारुकमियाँ घारे, रा. मांडला, ता. मुरुड जि. रायगड, यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये मृत्यु नोंदणी मिळणेकरीता अर्जदार यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांचा जन्म दि. ०१/०७/१९७१ रोजी, राहत्या घरी मौजे मांडला, ता. मुरुड-जंजिरा, ता.रायगड येथे झाला. अर्जदार यांस त्यांचे जन्मप्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदरहु नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी जन्माची नोंद अभिलेखावर घेण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाची हरकत असल्यास या जाहिरनाम्याचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय त्याला मागणीप्रमाणे जन्म दाखला देण्याचे आदेश देईल.

आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे कोलमांडले (अ) ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील

| अ. क्र. | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | वरकस क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १) | २८/१ | ०७-०९-०० | ०७-०९-०० | ०-०-० | ३.०२ |

**जमीन मालकाचे नाव :- श्री सुशील कुमार चत्रभुज पवार, श्री प्रदीपकुमार श्रीपाद बडवे, प्रसाद विनायक खेडकर, व संतोष एकनाथ सूर्यवंशी.**

यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याच्या बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्याच्या आजपर्यंत ताबे कब्जा व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणूकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी, वहिवाट ताबा बयाना पावती अखत्यारपत्र, साठेकरार गहाण बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लीन, बक्षिशी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हीत संबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाची आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे वकिलाची खात्री पटवून द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व भुजा विरहित आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतीही हक्क व हे संबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमच्याशी संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक : ०५/११/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा. ग स. कातकर सभागृह गाळा नं २ वाणी श्रीवर्धन

सही/-
**(ॲड.संतोष मारुती सापते )**

### जाहिर नोटिस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाची नमूद जमिन मिळकतीचे मुळ मालक आमचे अशिल श्री. अनंत तुकाराम चांदोकर वगैरे १२ यांची वडिलोपार्जित मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नवीन सर्व्हे नं. | जुना सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| चांदोरे ता.माणगांव | १७/११ | २४०/११ | ४-८५-०० | १.५० |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

सदरच्या मिळकतीच्या बाबतीमध्ये मा. तहसिलदार माणगांव यांनी दिलेल्या कुळवहिवाट दावा १०४/२०२४ हया दाव्याचा निर्णय मा. उपविभागीय अधिकारी सो. माणगांव यांच्या न्यायालयाने रद्द केला असून संबंधित मिळकतीच्या बाबतीमध्ये मा. महाराष्ट्र महसूल न्यायालय मुंबई यांचे न्यायालयात टेनन्सी रिव्हीजन अर्ज दाखल असून सुनावणी कामी प्रलंबित आहे. सदर मिळकतीच्या बाबतीत गोविंद पांडुरंग तांबे यांचे बरोबर श्री. जयेश विजयकुमार मोरे यांनी मा. दुय्यम निबंधक माणगांव यांचे कार्यालयात खरेदीखत दस्त क्र. ४१/२०२५ दिनांक ०३/०१/२०२५ नोंदविला असून सदरच्या दस्तास आमचे अशिल अनंत तुकाराम चांदोकर व इतर हे मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर माणगांव यांचे न्यायालयामध्ये खरेदीखताचा दस्त रद्द करणेकामी दिवाणी दावा ही दाखल करीत आहेत.

तरी या नोटीसीने सर्वांना सुचित करण्यात येत की, वर नमूद जमिन मिळकतीच्या संदर्भात श्री. जयेश विजयकुमार मोरे यांचेसोबत कोणीही खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये, तसा व्यवहार कोणी केला तर त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत असून संबधितावर आमचे अशिल मिळेल त्या सल्ल्यानुसार दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कारवाई करतील.

अलिबाग
दिनांक : ०५/११/२०२५

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु. पो. चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२७२६२००० ५

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३५८/२०२५

**जाहीरनामा**

अर्जदार श्रीम. निशाद बेगम फारुक मियाँ घारे, रा. मांडला, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड, यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये मृत्यु नोंदणी मिळणेकरीता अर्जदार यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांचा जन्म दि. ०६/०६/१९५५ रोजी, राहत्या घरी मौजे मांडला, ता. मुरुड-जंजिरा, ता.रायगड येथे झाला. अर्जदार यांस त्यांचे जन्मप्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदरहु नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी जन्माची नोंद अभिलेखावर घेण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाची हरकत असल्यास या जाहिरनाम्याचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकतीन दाखविल्या तर सदरहु न्यायालय त्याला मागणीप्रमाणे जन्म दाखला देण्याचे आदेश देईल.

आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**



# तंत्रशुद्ध फलंदाज अमोल मुझुमदार

विनायक दळवी

**भारतीय महिला क्रिकेट संघाने आयसीसी विश्वचषक जिंकला आणि संघातील खेळाडूंच्या प्रसिद्धी सोबतच प्रशिक्षक अमोल मुझुमदार याचं नाव चर्चेत आल. ११००० धावा करूनही भारतीय क्रिकेटचा गणवेश ज्याच्या अंगावर कधीच चढला नाही त्या अमोल वरील अन्यायाच्या चर्चेला पुन्हा एकदा उधाण आले. जेव्हा त्याच्या अंगावर भारतीय क्रिकेट संघाचा निळा गणवेश चढला तेव्हा त्या गणवेशाला यशाचा गंध देखील मिळाला. अमोलला यासाठी कित्येक तपाची प्रतीक्षा करावी लागली आणि अखेर २ नोव्हेंबर रोजी हा दिवस उजाडला.**

खरंतर अमोल एक तंत्रशुद्ध फलंदाज होता. आपण क्रिकेटमध्ये ज्याला 'कॉफी बुक स्टाइल' क्रिकेट खेळणे म्हणतो अगदी तसेच. त्यात चेंडू जमिनीलगत मारणे, 'व्ही' मध्ये खेळणे, स्वतः आखून दिलेल्या चौकटीमध्ये राहूनच संघासाठी आणि धावफलकासाठी खेळणे यांचा समावेश आहे. अमोलला ही देणगी त्याच्या वडिलांकडून म्हणजे अनिल मुझुमदार यांच्याकडून मिळाली होती. अनिल स्वतः एक दर्जेदार आणि तंत्रशुद्ध फलंदाज होते. बँक ऑफ बडोदा संघासाठी ते खेळायचे.

विश्वचषक जिंकल्यानंतर मैदानावर अमोल एका वृद्ध व्यक्तीच्या खांद्यावर हात टाकून आनंदाश्रू टाळत होता. तेच ते अनिल मुझुमदार. त्यानंतर त्यांच्या पाया पडतानाही दिसला. या अनिल मुझुमदार यांनी आपली सारी क्रिकेट गुणवत्ता आपल्या मुलामध्ये उतरवली. त्यांनी त्याच्याकडून क्रिकेटचे तंत्र घोटून घेतलं होतं. जेव्हा आचरेकर सरांच्या गुरुकुलात त्याची रवानगी करण्यात आली त्यावेळी अमोल एक तंत्रशुद्ध फलंदाज म्हणूनच त्या गुरुकुलत शिरला होता.

या तंत्रशुद्ध फलंदाजीच्या चौकटीत राहून अमोलने खोऱ्याने धावा गोळा केल्या. मात्र, अनेकांना त्यावेळी प्रश्न पडला की, एवढ्या धावा काढूनही अमोल भारतीय संघात का दिसत नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे, अमोल हा चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करायचा. ती जागा राहुल द्रविडने त्याच्या आधीच पटकावली होती. दोघेही समवयस्कर होते. दोघांच्याही बॅटीतून धावांचा वर्षाव होत होता. जसे बेदी यांच्या छायेखाली पद्माकर शिवलकर यांना भारतीय संघासाठी कधीच खेळता आले नाही, तीच गोष्ट बहुदा अमोलच्या बाबतीतही घडली असावी. कारण राहुलच्या छायेखाली तो खेळत होता. खरंतर अमोल आणि द्रविड हे दोघेही सारखेच तंत्रशुद्ध फलंदाज होते.

मात्र, द्रविडने काळाची गरज ओळखून आपल्या फलंदाजीचा वेग वाढविला. अमोलला त्यासाठी त्यावेळी कोणीतरी असा गुरु भेटला पाहिजे होता, ज्याने ही परिस्थिती बदलण्यात त्याला सहाय्य करणे गरजेचे होते. अमोलला वैयक्तिक दृष्ट्या जी गोष्ट यशाकडे नेऊ शकली नाही. मात्र, तीच गोष्ट भारतीय महिला क्रिकेट संघाला विश्व विजेतेपद मिळवून देण्यात कारणीभूत ठरली. कारण अमोल क्रिकेट या खेळावर सतत लक्ष केंद्रित करणारा होता. त्याला तंत्रशुद्ध फलंदाजी आणि योग्य गोष्टी करणे आवडायचे. त्यासाठी त्याने कोणत्याही गोष्टींची समझोता केला नाही. तीच गोष्ट भारतीय महिला क्रिकेट संघासाठी लाभदायक ठरली, कारण अमोलच्या आधी अनेक प्रशिक्षकाने आपापल्या प्रशिक्षणाच्या शैली आजमावून पाहिल्या होत्या. परंतु, यश कोणालाही मळिाले नव्हते. मात्र, अमोल स्वतः एक उत्तम फलंदाज असल्यामुळे त्याने संघातील फलंदाजांची फळी अधिक भक्कम केली. ज्यामुळे यंदाचा विश्वचषक आपण जिंकू शकलो. त्याने प्रत्येक फलंदाजांचा अभ्यास केला आणि त्यांना आपापल्या विकेटचे महत्त्व किती आहे हे त्यांना पटवून दिले. 'शेवटपर्यंत हार मानायची नाही आणि खेळपट्टीवर टिकून राहायचं' हा त्याचा कानमंत्र होता. जो भारतीय संघाला यंदाच्या स्पर्धेत अनेकदा अपयशाच्या गर्तेतून बाहेर काढून देणारा ठरला.

### योग्य व्यासपीठ आवश्यक

देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेत सतत चमकत राहिला. खोऱ्याने धावा काढत राहिला. मात्र, त्याचा भारतीय संघाकरिता कधीच विचार केला गेला नाही. त्यामुळे त्याची मधल्या फळीतील फलंदाजीचा दरवाजा कायमचा बंद झाला होतानुकताच भारतीय महिला संघाने वनडे वर्ल्ड कप जिंकला.

## निवडक

### पीएनपीच्या आर्या भोईरची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**अलिबाग :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अलिबाग, रायगड व पीएनपी सायरस पुनावाला स्कूल नागाव यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय शालेय मॉडर्न पेंटाथलॉन क्रीडा स्पर्धा २०२५/२०२६ नागाव येथे आयोजित करण्यात आली होती. पीएनपी सायरस पूनावाला स्कूल नागाव शाळेतील विद्यार्थिनी आर्या कृष्णा भोईर हिने १९ वर्षा खालील मुलींच्या वयोगटात चतुर्थ क्रमांक पटकावला, राज्यस्तरीय मॉडर्न पेंटाथलॉन क्रीडा स्पर्धेत तिची निवड झाली आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, पीएनपी सायरस पुनावाला स्कूल नागावच्या मुख्याध्यापिका गीतिका भूचर ,क्रीडा मार्गदर्शक राकेश म्हात्रे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




### डी. गुकेश विजयापासून वंचित

**पणजी :** गोव्यातील फिडे बुद्धिबळ विश्व करंडक स्पर्धेत दुसर्या फेरीतील पहिल्या डावात भारताचा विद्यमान विश्वविजेता डी. गुकेशला कझाकिस्तानचा ग्रँडमास्टर काझीबेक नोगरबेक याच्याविरुद्ध बरोबरीला मान्यता द्यावी लागली. विशेष म्हणजे या लढतीत काझीबेक काळ्या मोहर्यांनी खेळत होता. विद्यमान विश्वजेत्याविरुद्ध अशी कामगिरी करणे क्वचितच एखाद्या खेळाडूला शक्य होते. अन्य लढतीत ॲरोनियन, वेई यांनी विजय संपादन केले. अन्य एका लढतीत भारतीय ग्रँडमास्टर विदित गुजराथीला अर्जेंटिनाच्या १२ वर्षीय ओरो फॉस्टिनो या विलक्षण प्रतिभावान खेळाडूने दुसर्या फेरीच्या पहिल्या डावात त्याला बरोबरीत रोखत धक्कादायक निकालाची नोंद केली. या स्पर्धेतील दुसर्या डावाच्या प्रारंभी, राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी पाचवेळचा विश्वविजेता, फिडे उपाध्यक्ष विश्वनाथन आनंदच्या खास हजेरीत गुकेशच्या पटावर पहिली औपचारिक चाल खेळून फेरीचे उद्घाटन केले. अव्वल मानांकित खेळाडू असलेल्या गुकेशला नशिबाची साथ मात्र मिळाली नाही. खेळ सुरू होण्यापूर्वी आनंद आणि मुख्यमंत्री यांनी एका खचाखच भरलेल्या पत्रकार परिषदेला संबोधित केले. स्पर्धा जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार कोण, असे विचारले असता, आनंदने सावध पवित्रा घेतला.

### सह्याद्री संस्थेचे ॲथलेटिक्समध्ये यश

**चिपळूण :** मुंबई विद्यापीठ कोकण झोन विभागांतर्गत दि. ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान डेरवण येथे घेण्यात आलेल्या थलेटिक्स स्पर्धेत सावर्डे येथील सह्याद्री शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय, सावर्डे या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत आदेश अनंत बांद्रे याने गोळाफेक (मुले) व भालाफेक (मुले) या दोन्ही क्रीडा प्रकारात सुवर्णपदक मिळवले, तर ऋतुराज दत्तात्रय नाळे याने ४०० मी. डेकॅथलॉन (मुले) या क्रीडा प्रकारात रौप्यपदक प्राप्त केले. या दोन्ही खेळाडूंची पुढे होणाऱ्या अंतरविभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी कोकण विभागातर्फे निवड झाली आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य. टी. वाय. कांबळे, तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष आ. शेखर निकम यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

### आयुष पाटणकरला सुवर्णपदक

**सावंतवाडी :** महाराष्ट्र राज्य क्रीडा आणि युवक संचालनालय यांच्या वतीने नागपूर येथे घेण्यात आलेल्या १९ वर्षांखालील राज्यस्तरीय शालेय नेमबाजी स्पर्धेत येथील श्री पंचम खेमराज महाविद्यालयाचा विद्यार्थी आयुष पाटणकर याने प्रथम क्रमांक मिळवित सुवर्णपदक पटकाविले. तो राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करणार आहे. या स्पर्धेत आयुष्यने ४०० पैकी ३७९ गुण मिळविले. यापूर्वी असोसिएशनच्या झालेल्या स्पर्धेत तो राष्ट्रीय खेळाडू म्हणून घोषित झाला असून गेली ३ वर्षे राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेत आहे. गतवर्षी त्याला सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू हा पुरस्कार मिळाला होता. कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत आयुष्यने ४०० पैकी ३७८ गुण मिळवून सुवर्णपदक पटकाविले होते. या कामगिरीबद्दल त्याची राज्यातून ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे. आयुषच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.

# सुधागडच्या पुत्राचा क्रिकेट जगतात डंका

**■ महिला वर्ल्ड कपचा शिल्पकार अमोल मुजुमदार**

**■ कुंभारघर मुळगावात अभिनंदनाचा वर्षाव**

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**




भारतीय महिला टीमचे कोच अमोल मुजुमदार हे रायगड जिल्ह्याचे सुपुत्र आहेत. सुधागड तालुक्यातील कुंभारघर हे त्यांचे मूळ गाव आहे. सुधागडच्या सुपुत्राचा क्रिकेट जगतात डंका पाहावयास मिळत आहे, ही अभिमानास्पद बाब आहे.

भारताला महिला वर्ल्डकप जिंकवण्यात महत्त्वाची भूमिका असणारे मार्गदर्शक व ऐतिहासिक विजयाचे शिल्पकार मुजुमदार हे रायगड जिल्ह्याचे सुपुत्र असल्यामुळे रायगड जिल्ह्यासह सुधागड वासियांचा उर भरून आला आहे. परिणामी सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संपूर्ण भारतासह जिल्हा व सुधागड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवण्याचे काम अमोल मुजुमदार यांच्यामार्फत झाले आहे. सुधागड तालुक्यातील कुंभारघर येथील त्यांचे चुलत काका अमित मुजुमदार यांनी सांगितले की, अमोल मुजुमदार यांचे मूळ गाव सुधागड तालुक्यातील कुंभारघर हे आहे. त्यांचे वडील अनिल मुजुमदार तसेच त्यांच्या वडिलांचे वडील प्रभाकर मुजुमदार आणि एकूणच त्यांचे पूर्वज हे मूळचे कुंभारघर येथीलच आहेत. कुंभारघर येथे त्यांचे वडिलोपार्जित घर आणि जागा आहे. त्याचबरोबर सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथे त्यांचा फार्महाऊस सुद्धा आहे. अमोल मुजुमदार आपल्या परिवारासह नियमित या ठिकाणी येत असतात. त्याचबरोबर गावातील देवीच्या उत्सवासाठी आणि सुधागड किल्ल्यावरील भोराई मातेच्या उत्सवाला देखील ते आवर्जून हजेरी लावतात. जगभर नावाजलेले अमोल मुजुमदार हे आपले गाव आणि येथील लोकांसोबत नाळ अजूनही जोडून आहेत.

सुधागड तालुक्यातील राजयोगी मित्र मंडळाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून अमोल मुजुमदार आले होते. रायगडच्या सुपुत्राने अशा प्रकारे जगभरात देशाचे नाव उंचावले आहे. त्यामुळे येथील नागरिकांचा उर अभिमानाने भरून आला आहे. समाज माध्यमांवर देखील येथील स्थानिक नागरिक अमोल मुजुमदार यांना शुभेच्छा देत आहेत. अनेकांना अजूनही माहिती नाही आहे की अमोल मुजुमदार हे रायगडचे सुपुत्र आहेत. ज्या लोकांना या संदर्भात कळते ते अमोल मुजुमदार यांच्या नातेवाईकांना फोन करून विचारणा करत आहेत. असे देखील अमित मुजुमदार यांनी सांगितले.

# मीराबाईचा ऑलिंपिक मार्ग खडतर

**■ ४९ किलो वजनी गटाला कात्री**

**■ आता ५३ किलोत खेळावे लागणार**

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

टोकियो ऑलिंपिकमध्ये ४९ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावणाऱ्या भारतीय महिला वेटलिफ्टर खेळाडू मीराबाई चानू हिला मोठा धक्का बसला आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीकडून नव्या वजनी गटाला हिरवा कंदील दाखवण्यात आला आहे. त्यानुसार आता महिला विभागात ५३ किलो वजनी गटापासून सुरुवात होणार आहे. त्यामुळे मीराबाई चानू हिला आता ४९ किलो वजनी गटात सहभागी होता येणार नाही.

लॉस एंजेलिस ऑलिंपिक २०२८ मध्ये होणार असून, यामध्ये सहभागी व्हायचे असल्यास तिला ५३ किलो वजनी गटात खेळावे लागणार आहे.

दरम्यान, वर्षभरात दुसऱ्यांदा वजनी गट बदलण्यात आला आहे. मीराबाई चानूने यावर्षी राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावले होते. तसेच जागतिक स्पर्धेमध्ये रौप्यपदकाची कमाई केली होती. या दोन्ही स्पर्धेमध्ये ती ४८ किलो वजनी गटामध्ये सहभागी झाली. ऑलिंपिकसाठी नवा वजनी गट



आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीकडून पुढील ऑलिंपिकसाठी नव्या वजनी गटांना हिरवा कंदील दाखवण्यात आला आहे. महिला विभागात आता ५३, ६१, ६९, ७७, ८६ व ८६पेक्षा अधिक असे सहा वजनी गट असणार आहेत. आशियाई ही प्रतिष्ठेची स्पर्धा आटोपल्यानंतर २०२७ व २०२८ या दोन वर्षांमध्ये ती आपले वजन वाढवून ऑलिंपिकमध्ये ५३ किलो वजनी गटात सहभागी होण्याचा प्रयत्न करणार आहे. सध्या तरी मीराबाई चानू ही जुन्याच (४८/४९ किलो) वजनी गटात सहभागी होईल.



# पेण येथे बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन

**| खरोशी | प्रतिनिधी |**

पेण येथे महाराष्ट्र एल्बो बॉक्सिंग असोशिएशन व रायगड जिल्हा एल्बो बॉक्सिंग असोशिएशन ह्यांच्या विद्यमाने परशराम बाग पेण येथे कै. यशवंत शेट्ये ह्याच्या स्मरणार्थ आमदार रविंद्र पाटील राज्यस्तरीय आमदार चषकाचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेचे उद्घाटन प्रितम पाटील ह्यांच्या हस्ते करण्यात आले ह्यावेळी दीलीप लाड, जनार्दन जाधव, गौतम पाटील, रुपेश पाटील, डॉ. मंदार पनवेकर, सुरेश कोळी, यशवंत माने, रविंद्र म्हात्रे, संदीप माने, प्रशांत गांगर्डे, निलेश भोसले, पियुष सदावर्ते उपस्थित होते.

स्पर्धेचे आयोजन रविंद्र म्हात्रे ह्यांच्या मार्गदर्शना खाली विनायक पाटील, प्रथमेश मोकल, प्राजक्ता तेटमे, निलेश ओव्हाळ, रविना म्हात्रे, हर्षाली पेणकर, अयुष रसाळ, अशरफ अली, रितुल म्हात्रे, स्वरांगी घैसास, आयेष बेगम, स्मित म्हात्रे, मयुरेश म्हात्रे, आर्यन म्हात्रे, शितीज म्हात्रे, योगेश वैद्य, श्रुती म्हात्रे, रितेष पवार, शर्दुल बामगुडे, धैर्य पाटील, तेजश्री ऐवळे, तनीश वनारसे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले होते.

# ऑलिम्पिक असोसिएशन पॅनेलची घोषणा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ऑलिम्पिक पॅनेलचे पारडे जड असल्याचे स्पष्ट झाले आहे. येत्या रविवारी होणाऱ्या निवडणुकीत अजित पवार गटाचे २१ उमेदवार निवडणूक रिंगणात असून त्यांपैकी ३ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

मुंबईत २ नोव्होबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी ऑलिम्पिक पॅनलची घोषणा अर्जुनपदक विजेते अशोक पंडित आणि ध्यानचंद पदक विजेते प्रदीप गंधे यांनी केली आहे. ३० मतदार संघटनांपैकी २२ पेक्षा अधिक संघटनांनी अजित पवार यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे.

बहुमत असल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाचा विजय पक्का आहे. यापूर्वीच उपाध्यक्ष पदासाठी आदिल सुमारीवाला, प्रदीप गंधे व प्रशांत देशपांडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. विजयी उमेदवार आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू प्रदिप गंधे म्हणाले की, गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत देशात अव्वल स्थान पटकावले आहे. पाच वर्षांमध्ये महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेने राज्यातील सर्व क्रीडा संघटनांना सोबत घेऊन काम केले आहे. राज्यातील खेळाडूंनी प्रचंड मेहनत घेऊन मागील तीन वर्षांमध्ये तीनही राष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशात प्रथम क्रमांक मिळवलेला आहे. हे यश राज्यातील सर्व क्रीडा संघटना आणि खेळाडूंच्या प्रयत्नांचेच आहे.



### अजित पवार यांच्या पॅनेलचे उमेदवार

**अध्यक्ष – अजित पवार, वरिष्ठ उपाध्यक्ष – अशोक पंडित, उपाध्यक्ष – आदिल सुमारीवाला (बिनविरोध निवड), उपाध्यक्ष – प्रदीप गंधे (बिनविरोध निवड), उपाध्यक्ष – प्रशांत देशपांडे (बिनविरोध निवड), उपाध्यक्ष – दयानंद कुमार (बिनशर्त पाठिंबा), सचिव – नामदेव शिरगांवकर, सहसचिव – निलेश जगताप, उदय डोंगरे, मनोज भोरे, चंद्रजीत जाधव, खजिनदार – स्मिता शिरोळे, कार्यकारिणी सदस्य – संदीप चौधरी, संदीप ओंबासे, राजेंद्र निम्बाते, गिरीश फडणीस, रणधीर सिंग, किरण चौगुले, समीर मुणगेकर, संजय वळवी, सोपान कटके आदी.**

### दिव्यांग खेळाडूंसाठी क्रिकेट स्पर्धा

**मुंबई :** ऑल इंडिया क्रिकेट असोसिएशन फॉर फिजिकली चॅलेंज्ड यांच्या वतीने शारीरिकदृष्ट्या दिव्यांग खेळाडूंसाठी आंतरराज्यीय एलआयसी ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ५ ते ७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान पोलीस जिमखाना, इस्लाम जिमखाना आणि हिंदू जिमखाना, मरीन लाइन्स, मुंबई येथे होणार आहे. या स्पर्धेत एकूण १६ संघ सहभागी होत आहेत. जम्मू-कश्मीर, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, सौराष्ट्र, बडोदा, महाराष्ट्र, मुंबई, कर्नाटक, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू, विदर्भ, झारखंड आणि पश्चिम बंगाल या राज्यांचा त्यात समावेश आहे. एलआयसी हे या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक असून, तर सीएस इन्फोकॉम, न्यू इंडिया ॲश्युरन्स आणि महाजेनको हे सह-प्रायोजक आहेत.

### मैदानी स्पर्धेत कोल्हापूरचे वर्चस्व

**सावर्डे :** कोल्हापूर विभागीय शालेय मैदानी स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत अव्वल स्थान पटकावले. डेरवण येथील एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात झालेल्या कोल्हापूर विभागीय शालेय मैदानी स्पर्धेत पाच जिल्हे व तीन महानगरपालिका असे एकूण आठ संघांमधील १ हजार ४२३ खेळाडू सहभागी झाले होते. ही स्पर्धा १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुली यांच्यामध्ये आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये राज्य, राष्ट्रीय खेळाडूही सहभागी झाले होते. कोल्हापूर विभागातील विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत स्पर्धेची रंगत वाढवली.

**महाराष्ट्र विरुद्ध ओडिसा रंगणार सामना | भविष्यात होतकरू खेळाडू तयार होण्याची संधी**

# कूच बिहार ट्रॉफीसाठी रायगड क्रिकेट असो. सज्ज

**| अलिबाग | क्रीडा प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध आणि सुसज्ज असलेल्या नागोठणे येथील रिलायन्स क्रिकेट मैदानावर दि. १६ ते १९ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विरुद्ध ओडिसा ह्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या कूच बिहार ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीतील सामना होत आहे, ह्या सामन्यासाठी रिलायन्स नागोठणे विभाग व रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन पूर्णपणे सज्ज असल्याचे रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव जयंत नाईक यांनी प्रसार माध्यमांशी बोलतांना सांगितले. रिलायन्सच्या मैदानावर ह्या पूर्वी देखील रणजी करंडक व कूच बिहार ट्रॉफीचे सामने तसेच भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड (बीसीसीआई) आयोजित विविध स्पर्धेतील सामन्यांचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले आहे. रिलायन्स स्टेडियम, हिरवेगार मैदान, उत्तम दर्जाची खेळपट्टी, खेळाडूंची निवास व्यवस्था तेथील सुरक्षा व्यवस्था व एकूणच सर्व आयोजन रिलायन्स नागोठणे विभागातर्फे उत्तम दर्जाचे असते, तसा अहवाल बीसीसीआय कडे गेल्या काही वर्षांत गेला असल्याने रिलायन्सचे मैदान प्रथम श्रेणी क्रिकेट स्पर्धांसाठी मान्यताप्राप्त असल्याचे जयंत नाईक यांनी सांगितले आहे.



सामन्याचे नियोजन महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन व रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठणे विभाग यांच्या वतीने करण्यात येणार आहे.ह्या सर्व सुविधा प्राप्त असलेल्या मैदानावर भविष्यात देखील अनेक सामने होणार आहेत. हा सामना प्रेक्षकांना पाहण्यासाठी मोफत असणार आहे, अशा सामन्यातून रायगड जिल्ह्यातील खेळाडूंना प्रेरणा मिळेल व भविष्यात रायगड जिल्ह्यातून होतकरू खेळाडू तयार होतील अशी आशा जयंत नाईक यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली आहे.

सामन्याची पूर्व तयारी पाहणी करण्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव जयंत नाईक, सदस्य ॲड. पंकज पंडित, शंकर दळवी, संदीप जोशी, रिलायन्स हॉर्टिकल्चर विभागाचे प्रमुख शरद पवार, मैदानाचे कंत्राटदार संतोष कोठे, खेळपट्टी क्युरेटर कुमार पिंगळस्कर, संदेश पाटील, अजय वाघमारे उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)